## अपघातात चिमुकलीचा मृत्यू

**पनवेल ग्रामीण :** स्कुटीला पाठीमागून भरधाव कंटेनरने दिलेल्या धडकेत अडीच वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला आहे. या अपघाताप्रकरणी कंटेनरच्या चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रितवी तेजस पाटील (राहणार अंधेरी) असे मृत मुलीचे नाव आहे. तिचे आई-वडील रायगडहून येत असताना फाल्कन कंपनी गेट, गव्हाण फाट्याजवळ त्यांच्या स्कुटीला पाठीमागून आलेल्या भरधाव कंटेनरने धडक दिली. या अपघातात सर्वजण खाली पडले पान २ वर

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

रायगड गुरुवार । दि. ११ जून २०२६ । अंक ५ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## गोदावरी नदीत होडी उलटली

**बीड :** जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे गोदावरी नदी पात्रात तब्बल ३५ भाविकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची घटना घडली. या भीषण अपघातात एका महिला भाविकेचा मृत्यू झाला असून, अन्य एक महिला गंभीर जखमी झाली आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरल्यामुळे नावेचा तोल गेला आणि हा अपघात घडला. पुरुषोत्तमपुरी येथे सध्या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ३५ भाविक नदी ओलांडण्यासाठी एका नावेमध्ये बसले होते. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी त्यात बसवण्यात आले होते.

# उरी लष्करी कॅम्पमध्ये हँड ग्रेनेडचा अचानक स्फोट!

**। उरी । वृत्तसंस्था ।**

**उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ एक दुर्दैवी घटना घडली. लष्कराच्या कॅम्पमध्ये झालेल्या ग्रेनेड स्फोटात भारतीय लष्कराच्या दोन जवानांचा मृत्यू झाला आहे. हे दोन्ही शहीद जवान महाराष्ट्राचे सुपुत्र असल्याची माहिती समोर आली असून, या घटनेमुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशावर शोककळा पसरली आहे.**

**लष्कराच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी उरी सेक्टरमधील कमलकोट लष्करी कॅम्पमध्ये नेहमीप्रमाणे शस्त्रास्त्रांची आणि साहित्याची देवाणघेवाण सुरू होती. याच दरम्यान एका हँड ग्रेनेडचा अचानक स्फोट झाला, या भीषण स्फोटात दोन जवान गंभीर जखमी झाले होते. स्फोट झाल्यानंतर जखमी जवानांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले. परंतु उपचारादरम्यान दोन्ही जवानांची प्राणज्योत मालवली.**



### दुर्घटनेत महाराष्ट्रातील दोन जवानांचा मृत्यू

### लष्कराकडून चौकशीचे आदेश

या दुर्दैवी घटनेनंतर लष्कराने सर्व आवश्यक कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रिया सुरू केली आहे. हा स्फोट नेमका कसा झाला, याची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. प्राथमिक अंदाजानुसार हा केवळ एक अपघात असल्याचे दिसते आहे. श्रीनगरमधील संरक्षण विभागाच्या जनसंपर्क कार्यालयाने सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्यानंतर या घटनेबाबत सविस्तर अधिकृत पत्रक जारी केले जाईल.

### पाकिस्तानी मुलगा ताब्यात

जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर दुसरी एक घटना समोर आली आहे. पुंछ जिल्ह्यातील मेंढर सेक्टरमध्ये एका १४ वर्षांच्या पाकिस्तानी मुलाला सुरक्षारक्षकांनी ताब्यात घेतले आहे. हा मुलगा चुकून भारतीय हद्दीत दाखल झाला होता.पाकव्याप्त काश्मीरमधून नियंत्रण रेषा ओलांडून हा अल्पवयीन मुलगा मेंढर सेक्टरमधील नागरी टेकरी भागात आला होता. तिथे तैनात असलेल्या सतर्क भारतीय जवानांनी त्याला तातडीने ताब्यात घेतले. प्राथमिक तपासानुसार, हा मुलगा जाणीवपूर्वक न येता रस्ता भरकटल्यामुळे चुकून भारतीय हद्दीत आल्याचा अंदाज आहे. सध्या प्रस्थापित नियमांनुसार सुरक्षा यंत्रणांकडून त्याची चौकशी केली जात असून, सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याला पुन्हा पाकिस्तानात सुपूर्द केले जाण्याची शक्यता आहे.

### वेधक

## पोलिसांनी वाचविले अपघातग्रस्तांचे प्राण



**भाकरवड :** आंबेपूर नजिक दुचाकी व रिक्षा यांचा अपघात झाला. त्यावेळी ड्युटीवर असणारे कॉन्स्टेबल मेजर समीर म्हात्रे यांच्या प्रसंगावधानामुळे दोघांचे प्राण वाचले. दुचाकीस्वार नागोठणे दिशेने जात असताना रिक्षास जोरदार धडक देऊन अपघात घडला. घटनेची माहिती कळताच चेकपोस्ट पेझारी येथे ड्युटीवर हजर असणारे पोलीस कॉन्स्टेबल मेजर समीर म्हात्रे यांनी पत्रकार जीवन पाटील यांच्या माध्यमातून अपघातग्रस्तांच्या मदतीला चेक पोस्ट पेझारी येथे उभी असलेले ॲम्ब्युलन्स कोणत्याही ड्रायव्हरची वाट न बघता स्वतः त्वरित घटनास्थळी हजर राहून दिनेश सुधाकर नाईक, जान्या नाईक यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले.

## रसायनीत रस्ता ठेकेदारला मारहाण

**रसायनी :** चौक भिलवले गावच्या हद्दीत बांधकामाच्या ठेकेदारीवरून ठेकेदाराला मारहाण केल्याने तिघांवर खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन तानाजी ठोंबरे वय ५० वर्षे धंदा ठेकेदारी रा. भिलवले पोस्ट वावंढळ ता. खालापुर जि. रायगड यांची भिलवले येथे स.न. ३०/२ ही जमीन होती, पूर्वीच त्यांनी ती जमीन विकली होती, मात्र घेणारे यांनी ती जमीन त्यांनाच सांभाळण्यासाठी देऊन त्यांच्याच ताब्यात दिली होती, त्या जमिनीत भविष्यात काही विकास कामे करायची झाल्यास ती तुम्हीच करा असे तोंडी बोलणे झाल्या प्रमाणे जमीन मालकांनी ते काम सचिन ठोंबरे यांना करण्यास सांगितले. त्या प्रमाणे २० मे २६ पासून जमिनीला आरसीसी संरक्षण भिंतीचे काम सुरू करताना सोबत भाऊ आणि मित्राला घेऊन तिघे मिळून काम करू लागले. पान २ वर


# आरसीएफच्या पत्राने पालकांमध्ये संभ्रम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।**

नवे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यासाठी मोजकेच दिवस शिल्लक राहिले आहे. अनेक पालकांनी कुरुळ येथील आरसीएफच्या शाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतले आहे. मात्र आरसीएफ शाळेची ही इमारत वापरण्याचा डेक्कन एज्युकेशन संस्थेला तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांना कोणताही अधिकार नाही. त्यामुळे पालकांनी प्रवेश घेण्यापुर्वी माहिती करून घ्यावी, असे आरसीएफ प्रशासनाने पत्र पालकांना दिले आहे. आरसीएफ प्रशासनाच्या पत्रानंतर पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत शिक्षण विभाग काय भूमिका घेणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

कुरूळ येथील आरसीएफ शाळा, ही स्थापनेपासून पुणे येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, या शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनाअंतर्गत चालवली जात होती. संस्थेकडून ही शाळा चालवण्यास जून २०२४ पासून नकार देण्यात आला असल्याचा आरोप आरसीएफने केला आहे. या संस्थेला शाळा सुरू ठेवण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले होते. मात्र संस्थेने ते आदेश मानण्यास स्पष्ट नकार देऊन जून २०२४ पासून आपल्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी देखील नाकारली. केवळ शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी आरसीएफ व्यवस्थापनाने शाळेची इमारत व परिसर वापरण्यास हरकत घेतली नव्हती. परंतु दोन शैक्षणिक वर्षे पूर्ण होऊन देखील डेक्कन एज्युकेशन सोसायटी या संस्थेला शिक्षण विभाग परत आणू शकले नाही. संस्थेने स्पष्ट केले आहे की शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे त्यांचे कर्मचारी नाहीत. त्यामुळे कोणतीही लेखी परवानगी नसताना, शाळेतील कर्मचारी संस्थेचे नाव वापरुन नवीन प्रवेश घेत आहेत. आरसीएफ व्यवस्थापनाने गेल्या २ वर्षांत शाळेचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनानुसार भारतातील नामवंत संस्थेची निवड करण्यात आली होती. तांत्रिक कारणामुळे शिक्षण विभागाला शाळेचे हस्तांतरण नवीन संस्थेकडे करता येत नसल्याने उच्च न्यायालयात आरसीएफतर्फे याचिका देखील दाखल करण्यात आली. परंतु शाळा यापुढे सुरळीत चालू राहील असे यश आरसीएफ व्यवस्थापनाच्या प्रयत्नांना मिळाले नाही. आरसीएफ शाळा, ही पूर्णपणे खासगी विना अनुदानित असून तिची मान्यता डेक्कन एज्युकेशन सोसायटी, या संस्थेच्या नावे आहे. संस्थेने शाळा व्यवस्थापनास नकार दिला असल्याने शाळेची इमारत वापरण्याचा संस्थेस तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांना कोणताही अधिकार नाही, पान २ वर



राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलाइजर्स लिमिटेड (भारत सरकार का उपक्रम) सदा बढ़े समृद्धि की ओर

Rashtriya Chemicals and Fertilisers Limited (Government of India Undertaking) Let us grow together

1582

ISO 9001-2015, ISO 14001-2015, ISO 45000-2018 Compliant
थळ इकाई, थळ, तालुका अलिबाग, जिला रायगड (महाराष्ट्र) पिन - 402 208.
THAL UNIT, THAL, TALUKA ALIBAG, DIST. RAIGAD (MAHARASHTRA) PIN - 402 208.
● फैक्स : 02141 - 238206 / 238091 ● FAX : 02141-238206 / 238091
Website : www.rcfltd.com CIN L24110MH1978GOI020185

आर.सी.एफ./शाळा/२०२६/०१

दिनांक: ०८.०६.२०२६

**पालकांना सूचना**

आपणास कल्पना आहे की आरसीएफ शाळा, कुरुळ ही स्थापनेपासून 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे' या संस्थेच्या व्यवस्थापना अंतर्गत चालवली जात होती, परंतु संस्थेकडून सदर शाळा चालवण्यास जून २०२४ पासून नकार देण्यात आला, त्यानंतर शिक्षण अधिकारी (रायगड) यांनी संस्थेस शाळा सुरू ठेवण्याचे आदेश दिले होते, परंतु संस्थेने ते आदेश मानण्यास स्पष्ट नकार देऊन जून २०२४ पासून आपल्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी देखील नाकारली. केवळ शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या करिता आर.सी.एफ. व्यवस्थापनाने शाळेची इमारत व परिसर वापरण्यास हरकत घेतली नव्हती; परंतु दोन शैक्षणिक वर्षे पूर्ण होऊन देखील शिक्षण विभाग 'डेक्कन एजुकेशन सोसायटी' या संस्थेस परत आणू शकले नाही. संस्थेने स्पष्ट केले आहे की शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे त्यांचे कर्मचारी नाहीत अशा परिस्थितीत संस्थेकडून कोणतीही लेखी परवानगी नसताना, शाळेतील कर्मचारी संस्थेचे नाव वापरुन नवीन प्रवेश घेत आहेत असे आढळून आले आहे.

आर.सी.एफ. व्यवस्थापनाने गेल्या २ वर्षांत शाळेचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न केले, शिक्षण विभागाच्या मार्गदर्शना नुसार भारतातील नामवंत संस्थेची निवड शाळेची जबाबदारी पाहण्यासाठी करण्यात आली होती, तांत्रिक कारणामुळे शिक्षण विभागाला शाळेचे हस्तांतरण नवीन संस्थेकडे करता येत नसल्याने उच्च न्यायालयात आरसीएफ तर्फे याचिका देखील दाखल करण्यात आली, परंतु आरसीएफ व्यवस्थापनाच्या प्रयत्नांना शाळा यापुढे सुरळीत चालू राहील असे यश मिळाले नाही.

आरसीएफ शाळा, कुरुळ ही पूर्णपणे 'खाजगी विना अनुदानित शाळा' असून तिची मान्यता 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे' या संस्थेच्या नावे आहे, संस्थेने शाळा व्यवस्थापनास नकार दिला असल्याने शाळेची इमारत वापरण्याचा संस्थेस तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांना कोणताही अधिकार नाही.

वरील परिस्थिति लक्षात घेता पालकांना याबाबत सावध करण्यात येत आहे की, त्यांनी आरसीएफ शाळा, कुरुळ येथे प्रवेश घेण्यापूर्वी वरील बाबींची पूर्ण माहिती करून घ्यावी, जेणेकरून आपल्या पाल्यांचे हीत सुरक्षित राहील.

(महेश पाटील)
मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक

पंजीकृत कार्यालय : प्रियदर्शिनी, ईस्टन एक्सप्रेस हायवे, सायन मुंबई - 400 022

**आरसीएफच्या पत्रानंतर पालक वर्गात संभ्रम निर्माण झाला आहे. शाळा सुरु होण्यासाठी तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. आरसीएफच्या पत्रानंतर विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येण्याची चर्चा आहे.**

### शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण?

> आरसीएफ खासगी विना अनुदानित असून तीची मान्यता डेक्कन एज्युकेशन सोसायटी, या संस्थेच्या नावे आहे, संस्थेने शाळा व्यवस्थापनास नकार दिला असल्याने शाळेची इमारत वापरण्याचा संस्थेस तसेच त्यांच्या कर्मचाऱ्यांना कोणताही अधिकार नाही. आरसीएफ शाळा प्रवेश घेण्यापूर्वी पूर्ण माहिती करून घ्यावी.जेणेकरून पाल्यांचे हित सुरक्षित राहिल.
>
> – महेश पाटील,
> मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक

# स्फोटाच्या धमक्यांनी महाराष्ट्र हादरला

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

पुणे महापालिका, विधान भवन, आरएसएसच्या मुख्यालयाला उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. पुणे महानगरपालिका तसेच मुंबईतील विधानभवनाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा तात्काळ सतर्क झाली आहे. या पार्श्वभूमीवर विधानभवन परिसरात पोलीस बंदोबस्तात मोठी वाढ करण्यात आली असून संपूर्ण परिसराला कडेकोट सुरक्षा कवच देण्यात आले आहे.

धमकीची माहिती मिळताच श्वानपथक आणि बॉम्ब शोधक व नाशक पथक घटनास्थळी दाखल झाले. विधानभवनाच्या आत आणि बाहेर सखोल तपासणी मोहीम हाती घेण्यात आली असून श्वानपथकाच्या मदतीने प्रत्येक भागाची तपासणी केली जात आहे. प्रवेशद्वार, पार्किंग परिसर, कार्यालयीन विभाग तसेच सार्वजनिक वर्दळीच्या ठिकाणांची कसून झडती घेतली जात आहे. विधानभवन परिसरात येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची तपासणी करण्यात येत असून वाहनांचीही काटेकोर पडताळणी केली जात आहे. सुरक्षा यंत्रणांकडून कोणतीही जोखीम न पत्करता खबरदारीचे सर्व उपाय राबविण्यात येत आहेत.

### संघाचे मुख्यालय उडवण्याचाही मेल

पुणे महापालिकेला जो मेल आला होता त्यात संघ मुख्यालयाचा सुद्धा उल्लेख करण्यात आला होता. त्यामुळे संघ मुख्यालय, स्मृती भवनसह काही ठिकाणी चेकिंग करण्यात आली. त्यात काहीही आढळून आलं नाही. दररोज रुटीन चेकिंग सुरू असते मात्र आज मेल असल्याने अतिरिक्त चेकिंग करण्यात आली. संघ मुख्यलाय आणि परिसरात नियरीत सुरक्षा व्यवस्था लागलेली असते ते सकाळ संध्याकाळ चेकिंग करत असतात. मेलच्या अनुषंगाने सुद्धा चेकिंग करण्यात आली मात्र त्यात काहीही आढळून आलं नसल्याचं डीसीपी राहुल मदने यांनी सांगितलं आहे.

**पुणे महापालिकेला धमकी**

आज महापौर कार्यालय, पुणे महानगरपालिका येथे बॉम्ब ठेवल्याबाबत धमकीचा ई-मेल आला होता. हा ई-मेल कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी सकाळी १०:१५ वाजता पाहिला. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. त्यानंतर पुणे महानगरपालिका, पान २ वर

## पुलाचा स्लॅब कोसळून मुकादमाचा मृत्यू



**। पावस । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील कुर्धे-लिंगायतवाडी व खोताचीवाडी येथील नदीवरील नव्याने बांधण्यात येत असलेल्या छोट्या पुलाचा स्लॅब कोसळून ढिगाऱ्याखाली सापडल्याने मुकादमाचा जागीच मृत्यू झाला. अक्षय शिवाजी काटे (वय २६, रा. क्रांतिनगर, रत्नागिरी) असे त्याचे नाव आहे. ही घटना मंगळवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. यावेळी २ कामगार आणि ४ पादचारी बचावले.या दुर्घटनेमुळे खोताचीवाडी आणि फडकेवाडी या भागातील सुमारे १०० ते सव्वाशे लोकांचा संपर्क तुटला असून, विद्यार्थ्यांना दीड किलोमीटरचा वळसा घालून जावे लागणार आहे.

५५ लाख रुपयांच्या निधीतून पूल उभारण्यात येत होता. या पुलावर केवळ पहिला स्लॅब टाकण्यात आला होता. सोमवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे नदीला प्रचंड पाणी आले. वाहून आलेला कचरा-गाळ पुलाच्या लोखंडी खांबांमध्ये अडकल्याने अर्धवट पुलाला धोका निर्माण झाला होता. तो काढण्यासाठी सकाळी साडेनऊच्या सुमारास अक्षय काटे दोन पान २ वर

## कळंबोलीत पाणी मीटरचा गोंधळ

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

कळंबोलीतील हजारो पाणी ग्राहकांना सिडकोकडून फॉल्टी पाणी मीटरच्या नोटिसा बजावण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. संबंधित मीटर बदलण्यासाठी २,७०० ते ३,००० रुपये भरण्याची सक्ती करण्यात येत असून, निर्धारित मुदतीत मीटर न बदलल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशाराही नोटिसांमधून देण्यात आला आहे.

कळंबोली सेक्टर-४ येथील सुविधा सोसायटीसह एलआयजी, एमआयजी, एलआयसी तसेच के-४ आणि के-एल-१ परिसरातील अनेक ग्राहकांना अशा प्रकारच्या नोटिसा प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे हा प्रश्न केवळ पान २ वर

## काशीद समुद्रकिनारी दोन पर्यटक बुडाले

### एक पर्यटकाचा बुडून मृत्यू; एकाला वाचविण्यात यश

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात मिनी गोवा म्हणून प्रसिद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यातील काशीद बीचवर बुधवारी (दि. १०) घडलेल्या दुर्दैवी घटनेत जळगाव जिल्ह्यातील २५ वर्षीय तरुणाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला, तर दुसऱ्या तरुणाला लाइफगार्ड आणि पोलिसांनी सुखरूप बाहेर काढून जीवदान दिले.

मिळालेल्या माहितीनुसार, इम्रान अन्वर खान (वय ३७), अमीन मजीद शेख (वय २५) आणि मलिक नजीर शेख (वय २१, सर्व रा. कासोदा, ता. एरंडोल, जि. जळगाव) हे ताडपत्री विक्रीच्या व्यवसायानिमित्त काशीद व मुरुड परिसरात आले होते. कामानिमित्त आलेले हे तिघे मोकळ्या वेळेत काशीद बीचवर फिरण्यासाठी गेले होते. यावेळी समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या अमीन शेख आणि मलिक शेख यांना पाण्याचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्यात गेले.

घटनेची माहिती मिळताच मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी रोटकर, तसेच लाइफगार्ड मयुरेश बालकावडे आणि अरफाज सौदागर यांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. त्यांनी मलिक नजीर शेख याला सुखरूप बाहेर काढले. त्याला उपचारासाठी नांदगाव येथील आयुष्य हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

मात्र अमीन मजीद शेख याला वाचविण्यात यश आले नाही. त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. मृतदेह शवविच्छेदनासाठी मुरुड ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मुरुड पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्ष रसेडे हे करीत आहेत.

या घटनेमुळे काशीद परिसरात हळहळ व्यक्त होत असून, समुद्रात उतरताना पर्यटकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासन आणि लाईफगार्डकडून करण्यात आले आहे.

## अलिबाग किनारी डॉल्फीन मृतावस्थेत

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग समुद्रकिनारी डॉल्फीनचे पिल्लू मृतावस्थेत सापडले. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली आहे. मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र समुद्रातील प्रदूषण, मासेमारीच्या जाळ्यात अडकणे, वाहतुकीमुळे झालेली दुखापत तसेच इतर काही कारणांमुळे छोट्या डॉल्फीन मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असून तो साधारण दोन ते अडीच फुट लांबीचा असल्याची शक्यता वर्तविली आहे. अलिबागमधील न्यायालयाच्या मागे असलेल्या किनारी छोटा डॉल्फीन मृतावस्थेत असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास आले. शवविच्छेदनाच्या पान २ वर

### ६० टक्के नागरिकांची आभा कार्ड नोंदणी पूर्ण | राज्य सरकारची विशेष मोहीम

# रायगड होणार देशातील पहिला आरोग्य डिजिटल जिल्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

देशातील सर्वात पहिले आयुष्मान भारत डिजिटल जिल्हा होण्याच्या दिशेने रायगड जिल्ह्याने महत्त्वाचे पाऊल टाकले जात असून, त्यासाठी राज्य सरकारने विशेष मोहीम हाती घेतली आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशनअंतर्गत रायगड जिल्ह्याची मॉडेल जिल्हा म्हणून राज्य सरकारने निवड केली आहे.

या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मंगळवारी पनवेल येथील आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मॉडेल जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



रायगड जिल्ह्यात तसेच पनवेल महापालिका क्षेत्रात आतापर्यंत सुमारे ६० टक्के नागरिकांची आभा कार्ड नोंदणी पूर्ण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व नागरिक तसेच खासगी व शासकीय आरोग्य यंत्रणा आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या (एबीडीएम) कक्षेत आणण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. पुढील दोन महिन्यांत विशेष मोहीम राबवून जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी आरोग्य संस्था या डिजिटल आरोग्य व्यवस्थेशी जोडल्या जाणार आहेत.

या उपक्रमामुळे आभा कार्डधारक नागरिक कोणत्याही शासकीय किंवा खासगी रुग्णालयात उपचारासाठी गेल्यास त्यांच्या पूर्वीच्या आजारांची, उपचारांची व आरोग्यविषयक नोंदी एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. आभा कार्डमुळे रूग्णांना रूग्णालयात पेपरलेस कारभाराचा अनुभव मिळेल.


उद्घाटनप्रसंगी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनीलकुमार बर्नवाल यांनी सांगितले की, आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन केल्याने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध करून देता येतील.

रायगड जिल्ह्यात आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या सर्व सुविधा तळागाळापर्यंत पोहोचविणे आवश्यक असून, त्यासाठी ठोस रोडमॅप तयार करून काम करण्याची जबाबदारी सर्व संबंधित यंत्रणांवर आहे. या माध्यमातून रोगप्रतिबंधक आरोग्य व्यवस्थेकडे वाटचाल होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पान २ वर

# शेतकऱ्यांसाठी संघर्ष करणार

### शरद पवारांचा सत्ताधाऱ्यांना इशारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



वर्धापन दिनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, त्यांच्यासाठी लक्ष द्यावे लागेल. समाजासाठी काम करणाऱ्यांना हा देश माझा आहे, असं वाटणारा राज्यकारभार चालला पाहिजे, पण त्याची पूर्तता होत नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली आहे, असं यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान येत्या आठ ते दहा दिवसांमध्ये बसू, उपेक्षित समाजाचे प्रश्न एकत्र येऊन सोडवू. आवश्यकता असेल तर राष्ट्रवादी रस्त्यावर उतरेल, ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांना योग्य दिशा दाखवू. त्यांनी आपलं म्हणणं स्वीकारलं नाही तर संघर्ष करू, अशी घोषणा शरद पवार यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम वाय. बी. चव्हाण सेंटरमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात बोलताना शरद पवार यांनी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला आहे. यावेळी बोलताना त्यांनी सध्याच्या शेतकऱ्यांच्या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. खतासाठी शेतकऱ्यांची लाईन लागली आहे. रात्र रात्र खत मिळत नाही. खताच्या दुकानाबाहेर शेतकरी झोपले आहेत. ही अवस्था आहे. आज शेतकरी संकटात आहे. कर्जबाजारी आहे. कालच एक यादी आली. आठ दिवसांत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्याची माहिती त्यामध्ये आहे. या सत्ताधाऱ्यांना घामाची किंमत कळत नाही, म्हणून हा शेतकरी आत्महत्या करताना दिसत आहे, असं यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.

आज जगात अनेक संकट येत आहेत. गेले काही महिने इराण आणि इतर देशांचं युद्ध सुरू आहे. भारताचं वैशिष्ट्य म्हणजे आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये ज्या देशांवर अन्याय होतो, पान २ वर

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



## पान १ वरून

### आरसीएफच्या पत्राने पालकांमध्ये संभ्रम

असे आरसीएफ प्रशासनाने पत्र दिले आहे. आरसीएफच्या पत्रानंतर पालक वर्गात संभ्रम निर्माण झाला आहे. शाळा सुरु होण्यासाठी तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. आरसीएफच्या पत्रानंतर विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येण्याची चर्चा सुरु आहे. काही पालकांनी विद्यार्थ्यांचे नाव काढून अन्य शाळेत टाकले आहे. काही पालकांचे आरसीएफच्याच शाळेत प्रवेश घेतले आहे. शिक्षण विभागाच्या संचालकांकडून येणाऱ्या पत्रानंतरच शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांचे भवितव्य स्पष्ट होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षात घेता आरसीएफ शाळा ही कंपनीच्या मालकीच्या जागेत असली तरी शाळा सुरु राहणार आहे. एका शिक्षण संस्थेचे कर्मचारी या शाळेमध्ये आहेत. पुणे येथे झालेल्या सुनावणीमध्ये संचालकांनी शाळा सुरु ठेवण्यास सांगितले आहे. लवकरच त्यांच्याकडून पत्र प्राप्त होईल, असे माध्यमिक शिक्षणाधिकारी महारुद्र नाले यांनी सांगितले.

### पुलाचा स्लॅब कोसळून मुकादमाचा मृत्यू

कामगारांसह तेथे पोहोचले.

काटे हे अडकलेला गाळ काढत असतानाच खालील लोखंडी खांब सटकले आणि पुलाच्या एका भागाचा जड स्लॅब थेट त्यांच्या अंगावर कोसळला. कामगारांनी तातडीने धाव घेत त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांचा ढिगाऱ्याखाली सापडून जागीच मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, पोलिस अंमलदारासह शेकडो ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. काटे यांचा मृतदेह विच्छेदनासाठी रत्नागिरी शासकीय रुग्णालयात पाठवला.

पुलाखालील अक्षय काटे यांना मृत्यूने गाठले; मात्र पुलावर त्याचवेळी एक वेगळाच योगायोग घडला. एकूणच अवघ्या काही सेकंदाच्या अवकाशात पुलावर आणि पुलाखालील सहा जणांचे प्राण वाचले. ही दुर्घटना घडली, नेमके त्याचवेळी खोताचीवाडी येथील अभ्यंकर कुटुंब पुलावरून चालले होते. यात आशुतोष अभ्यंकर, त्यांच्या पत्नी आणि दोन मुली यांचा समावेश होता.

अभ्यंकर यांच्या पत्नी आणि मुली सुरक्षित पुढे गेल्या, तर आशुतोष अभ्यंकर यांना एका मित्राने हाक मारल्यामुळे ते पुलाच्या मुख्य भागावरून तत्काळ बाजूला झाले. ते बाजूला सरकले त्याचवेळी मोठा आवाज करत पुलाचा स्लॅब कोसळला आणि त्यात अक्षय काटे चिरडले गेले. काही सेकंदांच्या फरकाने अभ्यंकर कुटुंब बचावले. दुसरीकडे दोन कामगार पुलाखाली अक्षय काटे काम करीत असलेल्या भागाच्या शेजारील भागात (कम्पार्टमेंट) गाळ काढण्याचे काम करीत होते. काटेंच्या बाजूचा स्लॅब कोसळला आणि तेही या घटनेत बचावले.

गेल्या अनेक वर्षांच्या मागणीनंतर ५५ लाखांचा निधी मिळून हा पूल मंजूर झाला होता. ठेकेदाराच्या संथ आणि निकृष्ट कामामुळे एका निष्पाप तरुणाचा जीव गेला, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. याची चौकशी करून दोषींवर कारवाई झाली पाहिजे, असे विजय शिंदे यांनी सांगितले.

### रसायनीत रस्ता ठेकेदारला मारहाण

काल त्याच भिलवले गावातील ओळखीचे रमेश दत्तात्रेय पवार, गिरीश अनंता दाभणे व नितेष विटकर हे साईट वर येऊन काम बंद करण्यास सांगितले, या पुढे काम करायचे नाही, आम्हीच काम करणार असे दमदाटी करून विट दगडीने सचिन ठोंबरे याला मारहाण केली. काम बंद न केल्यास व आम्हाला न दिल्यास ठार मारू अशी धमकी देऊन निघून गेले. जखमी सचिन ठोंबरे याला चौक येथील रुग्णालयात उपचार घेण्यात आले.खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक विशाल पवार हे करीत आहेत.

### रायगड होणार देशातील पहिला आरोग्य डिजिटल जिल्हा

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन यांनी महाराष्ट्राने या मिशनमध्ये दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला. रायगड जिल्ह्यातील अंमलबजावणी यशस्वी झाल्यानंतर हे मॉडेल संपूर्ण राज्यात राबविण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. रायगड जिल्ह्यातील ३८३ शासकीय आरोग्य संस्थांमध्ये एबीडीएम संलग्न एचएमआयएस प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून आता खासगी आरोग्य संस्थांनाही या व्यवस्थेत सहभागी करण्यावर भर दिला जाणार आहे. कार्यशाळेत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे संचालक डॉ. पंकजकुमार अरोरा यांनी मिशनची तांत्रिक माहिती दिली, तर अतिरिक्त अभियान संचालक डॉ. जगन्नाथ वीरकर यांनी प्रशासकीय अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेला आरोग्य क्षेत्रातील सुमारे ६५० प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये शासकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, खासगी वैद्यकीय व्यावसायिक आणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश होता. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती नेहुलकर यांनी रायगडमधील आरोग्य क्षेत्रातील विविध उपक्रमांची माहिती दिली.आयुष्मान भारत डिजिटल मिशनच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल पनवेल महापालिकेला यापूर्वी राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. महापालिका क्षेत्रातील २६ आरोग्य केंद्रे, ५५९४ खासगी आरोग्य व्यावसायिक आणि १४७ खासगी आरोग्य संस्थांची एबीडीएम अंतर्गत नोंदणी पूर्ण झाली असून उर्वरित संस्थांचे ऑनबोर्डिंग सुरू आहे.

या कार्यक्रमात राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे संचालक डॉ. पंकजकुमार अरोरा, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरीक्त अभियान संचालक जगन्नाथ वीरकर, सहसंचालक डॉ. सुनीता गेहोलोत, उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, पनवेल मनपा मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, नगरसेवक डॉ अनिलकुमार भगत हे उपस्थित होते.

### अपघातात मुलीचा मृत्यू

आणि पत्नी आणि मुलगी गंभीर जखमी झाली. अडीच वर्षीय मुलीला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पनवेल पोलिसांनी कंटेनर ताब्यात घेतला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनंत परागे करत आहेत.

### स्फोटाच्या धमक्यांनी महाराष्ट्र हादरला

नवीन इमारत, महापौर कार्यालय येथे तात्काळ बंदोबस्त लावण्यात आला. पथकाने महापौर कार्यालय व पुणे महानगरपालिकेच्या संपूर्ण इमारतीची सखोल तपासणी केली. सदर तपासणीमध्ये बॉम्ब सदृश्य किंवा कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नाही. प्राप्त ई-मेलचा स्रोत व शोधण्यासाठी सायबर पोलीस स्टेशन मार्फत तांत्रिक तपास करण्यात आला, ही अफवा असल्याचे समोर आले आहे.

### कळंबोलीत पाणी मीटरचा गोंधळ

काही घरांपुरता मर्यादित नसून शहरातील मोठ्या संख्येने ग्राहकांना त्याचा फटका बसत असल्याचे दिसून येत आहे. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात मीटर नादुरुस्त कसे ठरले, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. हे मीटर सिडकोकडूनच पुरविण्यात आलेले असल्याने त्यांच्या तांत्रिक दोषांची जबाबदारी नागरिकांवर टाकणे योग्य नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. वारंवार मीटर नादुरुस्त होत असतील तर त्यासाठी सिडको प्रशासनाने जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणीही होत आहे.

दरम्यान, या मीटरप्रकरणामुळे नागरिकांना दुहेरी आर्थिक फटका बसत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. एकीकडे नवीन मीटरसाठी हजारो रुपयांची आकारणी केली जात असताना, दुसरीकडे पाण्याच्या बिलांमध्येही वाढ झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

याबाबत सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता प्रफुल देवरे यांनी सांगितले की, कळंबोली शहरात सुमारे ८ हजार पाणी ग्राहक आहेत. अनेक मीटर बंद अवस्थेत आहेत किंवा प्रत्यक्ष पाण्याचा वापर होत असतानाही योग्य नोंद करत नाहीत. अशा तांत्रिक निकषांनुसार संबंधित मीटर फॉल्टी आढळल्याने ग्राहकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

### शेतकऱ्यांसाठी संघर्ष करणार

त्या देशांना मदत करण्याचं आहे. आता ईराणवर हल्ले होत आहेत. आतापर्यंत आपलीजी परराष्ट्र नीती होती, ती आता सांभाळली जात नाही. त्यामुळे आता थांबायचं नाही, कामाला लागायचं, राष्ट्रवादी स्वस्थ बसणार नाही, ही भूमिका कर्तृत्व आणि कष्टाने दाखवून द्यायची आहे, असं आवाहनही शरद पवार यांनी आपल्या पक्षातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना केलं आहे.

### अलिबाग किनारी डॉल्फीन मृतावस्थेत

अहवालानंतर त्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे. डॉल्फीनच्या मृत्यूने पर्यावरणप्रेमींमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली असून खळबळ उडाली आहे. स्थानिकांच्या मदतीने मृत डॉल्फीनचे किनारी वाळूमध्ये दफन करण्यात आल्याची ामहिती प्राप्त झाली आहे.

# सांख्यिकी सर्वेक्षणांना नागरिकांनी सहकार्य करावे

। अलिबाग । प्रतिनिधी ।

भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयामार्फत देशभरात विविध सामाजिक व आर्थिक विषयांवरील माहिती संकलित करण्यासाठी नियतकालिक सर्वेक्षणे राबविण्यात येत आहेत. या सर्वेक्षणांमधून मिळणारी माहिती शासनाच्या धोरणनिर्मितीसाठी तसेच विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याने नागरिकांनी या उपक्रमांना सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

सध्या वार्षिक उद्योग सर्वेक्षण आणि नियतकालिक कामगार दल सर्वेक्षण ही सर्वेक्षणे सुरू असून, प्रशिक्षित क्षेत्रीय अधिकारी निवडलेल्या कुटुंबांना व आस्थापनांना भेट देऊन माहिती संकलित करीत आहेत. सर्वेक्षणादरम्यान दिलेली माहिती गोपनीय ठेवली जाते. रोजगार, उत्पन्न, उद्योग, व्यवसाय आणि जीवनमानाशी संबंधित अचूक माहिती उपलब्ध झाल्यास विकास योजनांचे नियोजन अधिक परिणामकारकपणे करता येते. त्यामुळे नागरिकांनी सर्वेक्षण अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रस्ता की भ्रष्टाचाराचा नमुना?

**श्रीवर्धन:** कोंढेपंचतन येथे सुमारे ४ कोटी ६० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या रस्त्याच्या दर्जाबाबत ग्रामस्थांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. नव्याने तयार झालेला रस्ता काही दिवसांतच उखडू लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, कामाच्या गुणवत्तेबाबत शंका व्यक्त करण्यात येत आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी जाऊन रस्त्याची पाहणी केली असता डांबराचा थर सहजपणे निघत असल्याचा दावा केला आहे. काही नागरिकांनी यासंदर्भातील व्हिडिओदेखील तयार केले असून, त्यामध्ये रस्त्यावरील डांबर हाताने उचलले जात असल्याचे दिसून येत आहे. डांबराखाली अपेक्षित प्रमाणात खडी किंवा मजबूत बेस लेयर नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रस्त्याच्या बांधकामात आवश्यक तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आले नसावे. धूळ व माती योग्य पद्धतीने साफ न करता थेट डांबर टाकल्यामुळे डांबराचा थर जमिनीशी घट्ट न चिकटता अल्पावधीत उखडू लागल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणामुळे ४.६० कोटी रुपयांच्या निधीचा वापर नेमका कसा झाला, कामाची गुणवत्ता तपासणी कोणी केली, तसेच संबंधित यंत्रणांनी देखरेख योग्यरित्या केली का, असे प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत. रस्त्याच्या कथित निकृष्ट कामामुळे परिसरात संतापाचे वातावरण असून, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. कामात दोषी आढळणाऱ्या ठेकेदार, अभियंते आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. समिर अनिल चेंदवणकर यांनी मौजे आंबेघर, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्रापैकी ७/१२ सदरी सामाईक मालकी हक्कांत असणारे विद्यमान मालक झेन अस्लम नाईक यांचे मालकीचे व हिश्शाचे असे संपूर्ण अविभक्त क्षेत्र हे त्यांचे कडुन कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| आंबेघर | २२८ | ००-१९-०० | ०.६२ |

वर वर्णन केलेल्या सदरहू जमिन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्रापैकी ७/१२ सदरी सामाईक मालकी हक्कांत असणारे विद्यमान मालक झेन अस्लम नाईक यांचे मालकीचे व हिश्शाचे असे संपूर्ण अविभक्त क्षेत्र हे प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीचा विषय आहे. सदरची मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहान, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात आणून द्यावेत. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात सोडुन दिला आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- पेण
दि.११/०६/२०२६

**ॲड. संदेश दिनकर गावंड**
रा. मु.दुरशेत, पो. बळवली ता. पेण, जि. रायगड
मो. क्र. ७०३०३३३६५४/८६०५४१४५६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती फरा शेख, वय ३८ वर्षे, रा. जी/०२, नौशीन प्लाझा, कादर पॅलेस, जामा मशिदच्या समोर, कौसा, ठाणे, मुंब्रा, जि. ठाणे, ४००६१२, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील बिनशेती जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै .) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८६/४१ | ३.४२.०० | ३४.२० | श्री. तानाजी मारूती चव्हाण व श्रीमती दिपाली दत्तात्रेय धनावडे |

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ११/०६/२०२६

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे .
मो. नं. ७३८५००४८०६.

### जाहीर नोटिस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की, मुळ जमिन मालक श्री. वसंत शंकर पाटील राहणार : तळाशेत, ता- अलिबाग जि. रायगड. यांच्या मालकीच्या ताबेकब्जातील आणि वहिवाटीतील मौजे : तळाशेत ता. अलिबाग, जि. रायगड. येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तळाशेत ता. अलिबाग, जि. रायगड.**

| गावाचे नाव | स. न. | हि. नं | क्षेत्र हे. आर. पॉ |
|---|---|---|---|
| तळाशेत | १२६ | | १.५०.८० |
| | | पोटखराबा | ०.०३.०० |
| | | एकूण क्षेत्र | १.५३.०० |

सदर वर वर्णन केलेली शेत जमिन मिळकत श्री. वसंत शंकर पाटील आपल्या मालकिचे शेतजमिन आमच्या अशिलांना कायमस्वरूपी विक्री करण्याचे ठरविले आहे. तसेच वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रिका दान, यप्ती लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी दाखला कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. या प्रमाणे मुदतीस हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे. असे समजून त्यासंबधी कोणतेही कायदेशिर हक्क हितसंबंध नाही. असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून खरेदी विक्रीचा व्यवहार आमचे अशिल ठरवून तो पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थीत केलेली कोणतीही हरकत आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/०६/२०२६

सही/-
**ॲड. शुभम वेळे**
ऑफिस नं. १३, वैद्य बाग सोसायटी,
कामत आळी, जुन्या नगरपालिका जवळ अलिबाग.
रायगड, ४०२२०१. मो. ९६५७७८०१०४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग २६०/३ एकुण क्षेत्र : ००-३८-०० (हे. आर.), आकार ६.९२ (रू.पैसे) ही शेतजमीन मिळकत श्री. शकील महामुद दरवेश यांच्या मालकी व ताबेकब्जाची असुन आमच्या अशिलांनी वर नमुद मिळकत कायम विकत घेण्याबाबत त्यांचे सोबत व्यवहार ठरविलेला आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याबाबत वरील विद्यमान मालकाने हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कोणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, हक्कसोडपत्र, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लायन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, अथवा सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित असल्यास, अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत हरकत सादर करावी.

उक्त मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्विवाद आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील. उक्त मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ११/०६/२०२६

**(ॲड. अजहर एम. घट्टे)**
घट्टे वाडी, मुख्य पोस्ट ऑफिस जवळ,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड. ४०२२०१
मो. ९७६३४१८३१४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. प्रित अमोल पाटील यांनी मौजे तळवली, तालुका मुरूड, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक अब्दुलसलीम मोहमदसाब दळवी वगैरे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) | भुधारणा पध्दत |
|---|---|---|---|---|
| तळवली | २६०/१ | १-१५-८०<br>०-२६-००<br>१-४१-८० | ८.८९/- | वर्ग-१ |

सदर मिळकतीपैकी अब्दुलसलीम मोहमदसाब दळवी यांचे नावे असलेली ०-२०-०० हे.आर. क्षेत्रफळ असलेली मिळकत

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापि सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १०/०६/२०२६

सही/-
**ॲड. अनिकेत एच. गुरव**
पत्ता : श्रीबाग नं. २, अलिबाग, जि. रायगड
ऑफीस : डॉ. केळकर क्लिनीक शेजारी,
शिवाजी चौक, ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं. : ९८५०४०२०५०

### ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे
### ता. माणगाव, जि. रायगड

दिनांक. १०/०६/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता. माणगाव, जि.रायगड ग्रामनिधी, १५वा वित्त आयोग सन २०२५-२०२६ अंतर्गत विकास कामाची निविदा खालीलप्रमाणे

| अ. क्र | कामाचे नाव/साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प. कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निवी आदिवासीवाडी येथे कंपोस्ट खड्डे बांधणे. | ५०,०००/- | २००/- | ५००/- | १६/०६/२०२६ सायं ०६:१५ वा पर्यंत | १७/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | १५वा वित्त आयोग |
| २ | निवी बौद्धवाडी येथील समाज मंदिरासमोर शेड बांधणे. | ७३७००/- | २००/- | ७३७/- | १६/०६/२०२६ सायं ०६:१५ वा. पर्यंत | १७/०६/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | ग्रामनिधी |

**अटी व शर्ती :**

१.सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा ना मंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता. माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातुन शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

**सही/-**
**श्रीम. ज्योती नथुराम उभारे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

### निविदा सूचना

दिनांक

ग्रामपंचायत नांदवी ता. माणगाव, जि. रायगड यांचेकडून खालील नमूद कामाकरीता ग्रा.प. हद्दीत बांधकाम ठेकेदाराकडून शासनाच्या अटी व शर्तीस आधीन राहून सिलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

सदर निविदा ग्रामपंचायत नांदवी कार्यालयाकडे दि. १५/०६/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्वीकारण्यात येतील.

| कामाचे नाव व ठिकाण | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम | निविदा सादर करणेची वेळ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
| कुंभार वाडा येथील कुडेकर येथील गटार बांधणे | १५ व वित्त आयोग | १५००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| आदिवासी वाडी येथील प्राथमिक शाळा येथील पिण्याच्या पाण्याची टाकी दुरूस्त करणे | १५ व वित्त आयोग | ५००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| जंगम आळी मुख्य रस्ता ते संतोष जंगम रस्ता काँक्रिट करणे | १५ व वित्त आयोग | १०००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| महिला बचत गटांना प्रशिक्षण देणे. | १५ व वित्त आयोग | ४००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| ग्रा.पं. कार्यालय दुरूस्ती | १५ व वित्त आयोग | ९७२००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| बगर मोहल्ला येथे गावकीचा पाणीपुरवठा मधून पाईप लाईन टाकणे | १५ व वित्त आयोग | १२००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| तक्का येथील पाणीपुरवठा पाईप लाईन दुरूस्ती करणे | १५ व वित्त आयोग | १२००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| अशोक नारायण सावंत ते एकनाथ सावंत नळ पाणी पुरवठा योजना पाईपलाईन दुरूस्त करणे | १५ व वित्त आयोग | ५००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| नांदवी प्राथमिक शाळेला हँडवॉश स्टेशन बांधणे | १५ व वित्त आयोग | ५१०१०/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |
| नांदवी रोहिदास वाडी समाजमंदिर येथे शौचालय बांधणे | १५% खर्च | १०००००/- | ३ महिने | २००/- | - | १५/०६/२०२६ | सायंकाळी ०६.०० | ग्रामपंचायत कार्यालय नांदवी |

अटी व शर्ती

१) सहभागी ठेकेदाराने निविदा सिलबंद लिफाफ्यात सादर करणे आवश्यक.
२) कोऱ्या निविदा प्रसिद्धीच्या दिनांकापासून निविदा विक्रीच्या अंतिम दिनांकापर्यंत कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेतच उपलब्ध होतील. निविदा फॉर्म निविदा फी घेताना कार्यालयात रोख स्वरूपात जमा करून त्याची पावती घेणे आवश्यक राहील. अन्यथा सदरची फी कार्यालयात बँक खातेमध्ये जमा करून जमा केलेली पावती सादर केल्यास कोऱ्या निविदा प्राप्त होतील.
३) अंदाजपत्रकातील १२% अथवा १८% जी.एस.टी. हा मूळ अंदाजपत्रकातील असल्याने मंजूर ठेकेदारांना सदरचा जी.एस.टी. हा मंजूर निविदेनुसार अदा केला जाईल.
४) खाडाखोड व दुरूस्ती केलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
५) निविदा मंजूर वा नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेले आहेत.
६) मंजूर निविदा धारक ठेकेदारास रूपये ५००/- बाँड पेपरवर असणाऱ्या अटी शर्तींना अधीन राहून स्वखर्चाने करारनामा करणे बंधनकारक राहील.
७) मंजूर विकास कामाचा निधी हा संबंधित कार्यालयाकडून प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे अदा केला जाईल.
८) प्राप्त निविदा दि. १६/०६/२०२६ रोजी सकाळी ठीक स. १२.०० वा. उघडण्यात येतील.
९) निविदा धारकाने निविदेसोबत आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबतची सूचना ग्रामपंचायत नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष/सचिव, साई अपार्टमेंट को.ऑ.हौ.सोसा लि; प्लॉट नं. ०२, सेक्टर ०८, खांदा कॉलनी | १४ गुलमोहर, ०४ नारळ, ०२ अशोक, ०१ सावर ०१ आंबा, ०१ बदाम व ०१ उंबर अशी एकूण २४ झाडे तोडणे | साई अपार्टमेंट को.ऑ.हौ.सोसा.लि. प्लॉट नं. ०२ सेक्टर ०८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प) या संस्थेच्या आवारातील २४ झाडे इमारतीचे पुनर्विकास करणेस बाधित होत आहेत. |
| २ | अध्यक्ष/सचिव, तोरणा को. ऑ.हौ.सोसा.लि. बिल्डींग नं. ६ ते ८ व १६, १७ १८ प्लॉट नं. ०२, सेक्टर १७, नवीन पनवेल | ०५ अशोक, ०३ आंबा, ०२ जांभूळ, ०२ नारळ व ०१ बदाम अशी एकूण १३ झाडे तोडणे | तोरणा को.ऑ.हौ.सोसा.लि. बिल्डींग नं. ६ ते ८ व १६, १७, १८, प्लॉट नं. ०२, सेक्टर १७, नवीन पनवेल (पू) या संस्थेच्या आवारातील १३ झाडे इमारतीचे पुनर्विकास करणेस बाधित होत आहेत. |
| ३ | अध्यक्ष/सचिव, सह्याद्री को.ऑ.हौ.सोसा.लि; ई-१/६ ते ई- १/१० प्लॉट नं. ०२, सेक्टर १४ नवीन पनवेल (पू) | ०३ नारळ व ०१ अशोक अशी एकूण ०४ झाडे तोडणे | सह्याद्री को.ऑ.हौ.सोसा.लि; ई-१/६ ते ई- १/१० प्लॉट नं. ०२, सेक्टर १४, नवीन पनवेल (पू) या संस्थेच्या आवारातील ०४ झाडे इमारतीचे पुनर्विकास करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.PMC-PARK/246/2026-PTAD

### जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे पक्षकाराने आम्हाला दिलेल्या माहिती आणि अधिकाराप्रमाणे आणि आमच्या पक्षकारातर्फे पुढील प्रमाणे जाहीर नोटीर देण्यात येत आहे.

सर्व जनतेस, आमचे पक्षकार श्री. मच्छिंद्र लक्ष्मण बोर्ले वय ३५ वर्षे, धंदा. नोकरी, राहणार. ठाणेन्हावे, पो. साजगाव, ता. खालापुर, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती वरून, त्यांचेतर्फे खालील सही करणार यांचे मार्फत जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

आमच्या पक्षकाराच्या मालकी हक्काच्या शेतजमिनी मौजे ठाणेन्हावे, ता. खालापुर, जि. रायगड येथे सर्वे नंबर. २३/४, सर्वे नंबर - २७/५ व ७३/३ आहेत. त्याची केवळ व्यवस्था पाहण्यासाठी व कोर्ट विषयक कामे करण्यासाठी, श्री. प्रफुल विनायक देशमुख वय ६४ धंदा, राहणार. ६९९/३, गुलमोहर पलस्पे, पास राम मंदीर, पलस्पे पनवेल, जि. रायगड यांना दिनांक. १९/०५/२०२५ रोजी, कुलमुखत्यार पत्र दस्त क्रमांक. ३४७५/२०२५ आमच्या पक्षकाराने करून दिले होते, त्याचा गैरवापर करून मौजे ठाणेन्हावे येथील सर्वे नंबर ७३/३ चा जो दस्त दिनांक २०/०२/२०२६ रोजीचा दस्त क्रमांक - १८१२/२०२६ देखील कायदेशीर कार्यवाही करून रद्द करणार आहोत. आमचे पक्षकार आता सर्व व्यवस्था स्वतः पहात आहेत तसेच यापुढेही पाहणार आहेत. सबब श्री. प्रफुल विनायक देशमुख यांचे कुलमुखत्यार पत्र दस्त क्रमांक. ३४७५/२०२५ मधील त्यांना दिलेले सर्व अधिकार या नोटीसद्वारे रद्द केले आहेत.

सदर बाब सर्वांना माहिती व्हावी म्हणून ही जाहीर नोटीस दिली आहे. तरी सदर श्री. प्रफुल विनायक देशमुख यांचे बरोबर कोणीही कसलाही व्यवहार आमच्या मालकीच्या मिळकतीबाबत अगर हितसंबंधास बाध करून नये. केल्यास तो आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. म्हणून माहितीसाठी, आणि पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी, आमच्या पक्षकारातर्फे ही जाहिर नोटीस दिली आहे.

स्थळ :- खालापुर
दिनांक :-१०/०६/२०२६

वकील
**ॲड. श्री. सचिन दत्तात्रेय पाटील**
पत्ता :- आमली पेट्रोल पंप शेजारी
मु. आमली, पो. वळके, ता. मुरुड,
जि. रायगड. पिन कोड - ४०२२०२.
मो. नं. ७०५७००३२६४

# गगनभेदी विकास उरणकरांना श्राप?

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्याच्या विकासाची गगनभेदी घोषणाबाजी सुरू असली, तरी प्रत्यक्षात हा विकास उरणला समृद्ध करण्यासाठी की बुडवण्यासाठी, असा संतप्त सवाल सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत. पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असताना, संपूर्ण तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही वर्षांत विकासाच्या नावाखाली झालेल्या भरावांनी, अनियंत्रित बांधकामांनी आणि नैसर्गिक जलमार्गांच्या झालेल्या कत्तलीने उरणच्या अस्तित्वालाच धोका निर्माण केला आहे. त्यामुळे उरणमध्ये होणारा गगनभेदी विकास हा विकास नसून उरणकरांसाठी श्राप असल्याची चर्चा स्थानिकांमधून होत आहे.

उरण तालुका हा समुद्रकिनारी वसलेला भाग आहे. पूर्वी मुसळधार पाऊस पडला तरी पाण्याचा निचरा नैसर्गिक नाले, खाड्या, ओढे आणि मोकळ्या जागांमधून होत असे. मात्र,



## विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हत्या

स्थानिक नागरिकांच्या मते, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कोट्यवधी रुपयांची कामे दाखवली जातात; परंतु, प्रत्यक्षात मात्र पावसाच्या पहिल्याच सरीत पाणी साचते. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक पर्यावरणाची हत्या करून आता त्याची किंमत सर्वसामान्य उरणकरांना मोजावी लागत आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनीही याबाबत गंभीर इशारा दिला आहे. त्यांच्या मते, समुद्रकिनारी असलेल्या भागात अनियंत्रित भराव आणि जलमार्गांचे अतिक्रमण ही भविष्यातील महापूराची नांदी ठरू शकते. आज जर यावर कठोर निर्णय घेतले नाहीत, तर उद्या संपूर्ण उरण तालुक्याला त्याची मोठी किंमत चुकवावी लागू शकते.

आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. विकासाच्या नावाखाली समुद्रात भराव टाकून प्रकल्प उभे राहिले, खाड्यांवर अतिक्रमण झाले, शेतजमिनी बुजवून बेकायदेशीर याड्‌र्स आणि वसाहती उभ्या राहिल्या. परिणामी पाण्याच्या नैसर्गिक वाटाच बंद झाल्या आहेत. जेएनपीए, विविध बंदर प्रकल्प, साडेबारा टक्के भूखंडांसाठी सुरू असलेले भराव, औद्योगिक कंपन्यांची वाढ, मोठमोठ्या गृहनिर्माण योजना आणि अनधिकृत याड्‌र्स यामुळे संपूर्ण भौगोलिक रचनाच बदलून गेली आहे. ज्या जमिनी पावसाचे पाणी शोषून घेत होत्या, त्या आज सिमेंट-काँक्रीटखाली गाडल्या गेल्या आहेत. परिणामी पडणाऱ्या प्रत्येक थेंबाचे पाणी आता नागरिकांच्या घरांकडे धाव घेणार आहे. विशेष म्हणजे अनेक गावांच्या भोवतीचा भराव हा गावांच्या उंचीपेक्षा जास्त झाला असून, धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुसळधार पाऊस पडल्यास पाणी थेट घरांमध्ये, शाळांमध्ये, मंदिरांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी घुसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

उरण शहरासह चाणजे, दास्तान, जासई, करंजा, खोपटा, पागोटे, धुतूम, नवघर, कुंडेगाव, नवीन शेवा, भेंडखळ,जसखार, सोनारी, करळ, सावरखार, चिरनेर, वेश्वी, दादरपाडा, कोप्रोली, वशेणी आणि इतर अनेक गावांमध्ये नागरिकांनी याबाबत चिंता व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी नाले साफ झालेले नाहीत. काही ठिकाणी नाल्यांचे अस्तित्वच संपुष्टात आले आहे. तर काही ठिकाणी बांधकामांच्या भरावाखाली नाले गाडले गेल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. यावर्षी हवामान खात्यानेही जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यातच येत्या काही दिवसांत मान्सून उरण परिसरात दाखल होण्याची शक्यता आहे. अशावेळी जर रात्रीच्या वेळी मुसळधार पाऊस आणि समुद्रातील मोठी भरती यांचा संगम झाला तर परिस्थिती अत्यंत भयावह होऊ शकते. पावसाचे पाणी बाहेर जाण्याचा मार्ग बंद आणि समुद्राचे पाणी आत येण्याचा धोका वाढल्यास अनेक वस्त्या जलमय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सर्वात चिंतेची बाब म्हणजे अशा परिस्थितीत आपत्कालीन यंत्रणा कितपत सज्ज आहेत, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. यंदाच्या पावसात उरण वाचणार की विकासाच्या नावाखाली उरणला कायमचे बुडवले जाणार? असा प्रश्न सध्या उरणकरांच्या मनात घोंघावत आहे.

## निवडक

### महाडमध्ये दुचाकीसह कार खाक



**महाड :** तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्ग लगत असलेल्या सिमरन मोटर्स सर्व्हिस सेंटर समोर दुपारच्या सुमारास एक भीषण घटना घडली. एक दुचाकीस्वार आपल्या गाडीवरून पेट्रोलने भरलेला कॅन घेऊन जात होता. त्यावेळी पाऊस पडत असतानाही अचानक दुचाकीला आग लागली आणि त्यात दुचाकी जळून खाक झाली. त्याचबरोबर दुचाकीस्वार सोबत घेऊन जात असलेल्या पेट्रोल कॅनमधील पेट्रोल रस्त्यावर सांडून वाहत गेल्याने रस्त्याच्या कडेला उभी असलेली व्हॅगनार गाडीने देखील पेट घेतला. यादरम्यान, घटनास्थळी नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. ही आग आटोक्यात आणण्यासाठी महाड नगरपरिषद तसेच एमआयडीसी अग्निशमन दलाने शर्यतीचे प्रयत्न केले. परंतु, आगीने रुद्र रूप धारण केल्यामुळे ती नियंत्रणात आणण्यासाठी जवळपास दोन तासांचा कालावधी लागला. मात्र, तोपर्यंत दोन्ही वाहने पुर्णपणे जळून मोठे नुकसान झाले आहे.



### म्हसळ्यातील जाखमाता मंदिर उद्‌ध्वस्त

**म्हसळा :** तालुक्यातील संदेरी येथील दोन गावकीच्या रजिस्टर सामंजस्य कराराला केराची टोपली दाखवत गावातील काही समाजकंटकांनी पुरातन देवस्थान असलेल्या श्री जाखमाता देवी मंदिर रात्रीच्या सुमारास जेसीबीच्या सहाय्याने उद्‌ध्वस्त केले. ही माहिती समाज कंटकातीलच एकाने पोलीसांना दिल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. श्री जाखमाता देवी मंडळ ही संस्था मंदिर जीर्णोद्धार कार्य कायदेशीर कामगिरी करीत असताना गावातील काही समाजकंटकांनी हजारो भक्तांच्या श्रद्धेवर घाला घातला आहे. हा एकप्रकारचा मंदिरावर दरोडा असल्याची चर्चा सुरू आहे. या घटनेचा मुंबई आणि स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र शब्दात निषेध करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा देखील त्यांच्याकडून देण्यात आला आहे.

### वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा



**रायगड :** क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार मिळविणाऱ्या अलिबागमधील तनिष्का राकेश पाटील हीने तिचा वाढदिवस एक आगळ्या वेगळ्या उपक्रमातून साजरा केला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांची गरज आहे, हे लक्षात घेऊन तिने घरासमोरच औषधी रोपांची लागवड करण्यावर भर दिला. 'झाडे लावा झाडे जगवा' हा संदेश या उपक्रमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अलिबाग तालुक्यातील वाघोडे येथील रहिवासी असणारी तनिष्का पाटील हीचा बुधवारी (दि.१०) वाढदिवस साजरा करण्यात आला. तिने शेजारील मुला-मुलींना एकत्र केले. वडीलांच्या मदतीने घरासमोर लहान खड्डे तयार केले आणि त्यात कडूलिंब या औषधी वनस्पतींच्या रोपांची लागवड केली. 'झाडे जगली पाहिजे', हा उद्देश समोर ठेवून तिने एक आगळ्या वेगळ्या उपक्रमातून वृक्षारोपण करण्यावर भर दिला. तनिष्काने आतापर्यंत कराटे स्पर्धेत ४० हून अधिक पदके कराटे क्रीडा क्षेत्रात मिळविली आहेत.

### संजय नाईक यांच्या कार्याचा गौरव

**अलिबाग :** जागतिक इलेक्ट्रिशियन दिनाच्या निमित्त वेगा लाइफ टेक्नो सर्व्हिसेसमधील इलेक्ट्रिशियन संजय नाईक यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. गेली २६ वर्षे संजय यांनी अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि अथक परिश्रमाने आपली जबाबदारी पार पाडली आहे. त्यांनी ग्राहकांशी केवळ व्यावसायिक नाते जपले नाही, तर आपल्या कामाच्या गुणवत्तेमुळे आणि विश्वासार्हतेमुळे ग्राहकांच्या मनात एक विशेष स्थान निर्माण केले आहे. आज वेगा लाइफ टेक्नो सर्व्हिसेसकडे ग्राहक ज्या सन्मानाने, विश्वासाने आणि आदराने पाहतात, त्यामध्ये संजय यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. कोणत्याही संस्थेसोबत सलग २६ वर्षे निष्ठेने कार्यरत राहणे ही आजच्या काळातील खरोखरच अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब आहे. त्यांच्या या समर्पणाचे, कर्तव्यनिष्ठेचे आणि उत्कृष्ट सेवाभावाचे कौतुक वेगा लाइफ टेक्नो सर्व्हिसेतर्फे करण्यात आले.

# पीर-फणस डोंगरीत जीवघेणे बांधकाम

| पेण | प्रतिनिधी |

पेण शहरातील पीर डोंगरी आणि फणस डोंगरी परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वाढलेल्या अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शासनाच्या मालकीच्या जागांवर गेल्या १५ ते २० वर्षांत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाल्याने या भागात झोपडपट्टीसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पेण नगरपालिकेला पाणी, वीज, रस्ते आणि इतर नागरी सुविधांच्या समस्या सोडवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



या परिसरातील धोकादायक परिस्थितीचे गंभीर उदाहरण दोन दिवसांपूर्वी समोर आले आहे. एका घराच्या बांधकामाचे काम सुरू असताना वेल्डिंग करत असलेल्या कामगाराला घरावरून गेलेल्या जिवंत विद्युत तारेचा जोरदार धक्का बसला. सुदैवाने त्याचा जीव वाचला असून, सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे संबंधित घरावरून थेट विद्युत वाहिनी गेलेली असतानाही घरमालकाने कोणतीही सुरक्षितता न बाळगता बांधकाम सुरू ठेवले. महावितरणकडून काम बंद करण्याची लेखी नोटीस देण्यात आली असतानाही आजही काम सुरू असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी महावितरणच्या कनिष्ठ अभियंता तबसुम सय्यद यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, संबंधित घरमालकाला काम बंद करण्याबाबत लेखी नोटीस देण्यात आलेली आहे.

मात्र, नोटीसनंतरही जर जीवघेण्या परिस्थितीत बांधकाम सुरूच राहत असेल, तर प्रशासन नेमकी कोणती कारवाई करणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे. भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# पनवेल एसटी आगारात मोठी कारवाई

## प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल



| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल बस स्थानक परिसरात रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर चहाच्या टपऱ्या आणि दुकाने रात्रभर सुरू राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या टपऱ्यांवर प्रतिबंधित अन्नपदार्थांची राजरोसपणे मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात असल्याची माहिती माध्यमांमधून जाहीर झाल्यानंतर, अन्न व औषध प्रशासन विभागाने बुधवारी (दि.१०) एक मोठी गुप्त कारवाई केली. या कारवाईत हजारो रुपयांचा माल जप्त करण्यात आला .

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल बस स्थानक परिसरातील महाराजा स्वीटस कॉर्नरसमोर उड्डाणपूलाखाली रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर चहाच्या टपऱ्या आणि दुकाने रात्रभर सुरू राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या टपऱ्यांवर प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि सिगारेटची राजरोसपणे मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात असल्याची माहिती माध्यमांमधून जाहीर झाल्यानंतर, रायगड झोन १ मध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने बुधवारी मध्यरात्री पनवेल एसटी डेपो परिसरातील वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. या छाप्यात प्रतिबंधित अन्नपदार्थांची बेकायदेशीर साठवणूक आणि विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. त्यामध्ये चार जणांवर कारवाई करत फुटपाथवर तात्पुरते टेबल लावून व्यवसाय करणे, गाडीद्वारे विक्री करणे अशांवर देखील कारवाई करून त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे. तसेच, करून त्यांच्याकडून ४ हजार २५७ किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये गाडी सुद्धा जप्त करण्यात आली आहे. याबाबत त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या कारवाईमुळे पनवेलमधील बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

# विजेच्या प्रश्नांवर स्थानिक आक्रमक

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरात मागील दोन महिन्यांपासून विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. त्यामुळे या विजेच्या प्रश्नावर स्थानिक आक्रमक झाले आहे. यावर कायमचा तोडगा काढण्यासाठी स्थानिकांसह महावितरणच्या ग्राहकांकडून एक बैठक बोलाविण्यात आली होती. या बैठकीत महावितरणचे उप अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी सर्व ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेतले. तसेच, शहरासाठी मागील दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर विकास कामांना मंजुरी मिळाली असल्याचे जाहीर केले. दरम्यान, पुढील १० दिवसांत तीन ठिकाणी नवीन वीज रोहित्र बसवून



दिले जातील आणि मंजूर असलेली सर्व कामांना सुरुवात केली जाईल, असे आश्वासन उपअभियंता केंद्रे यांनी दिले. यावेळी महावितरणचे उपअभियंता चंद्रकांत केंद्रे, सहायक अभियंता सचिन आटपाडकर आदींसह माथेरान उप नगराध्यक्ष संतोष शेलार, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक अर्चना भिलारे, नगरसेवक गौंग वाघेला, रिझवान शेख, स्वीकृत नगरसेवक प्रवीण सकपाळ, माजी उप नगराध्यक्ष राजेश दळवी, कुलदीप जाधव, राजेश चौधरी, चंद्रकांत जाधव, गिरीश पवार, योगेश जाधव, अनंता शेलार, संतोष बर्गे आदी उपस्थित होते.

# उलवेत दारू टपऱ्यांवर कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

उलवे परिसरात शासनाने दारू विक्रीचे परवाने दिले नसल्याने दारूविक्री ही थेट पानटपऱ्या आडून सुरू आहे. अशाच टपऱ्यांवर सिडकोने बुलडोझर फिरवून टपऱ्या उद्‌ध्वस्त केल्या. याच कारवाई दरम्यान विना परवानगी बांधकामांवर सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने कारवाई करत वॉशिंग सेंटर, पत्राशेड आणि दारूचे अड्डे देखील पाडून टाकले आहेत. ही कारवाई सिडको मंडळाच्या मुख्य दक्षता अधिकारी सूरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

# कर्मचाऱ्यांच्या संपामुळे कामकाजावर परिणाम

| पनवेल | प्रतिनिधी |

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) कर्मचाऱ्यांनी एकदिवसीय लाक्षणिक संप पुकारला. पनवेल आरटीओमध्ये यापूर्वीच कर्मचाऱ्यांचा वानवा आहे. त्यातही शिल्लक असलेले ७ कर्मचारी संपात सहभागी झाल्याने वाहन नोंदणी, परवाने आणि अन्य प्रशासकीय कामांसाठी आलेल्या नागरिकांची कामे खोळंबली. आधीच मनुष्यबळाच्या तीव्र कमतरतेचा सामना करणाऱ्या पनवेल आरटीओमध्ये संपामुळे कामकाजावर मोठा परिणाम झाला असून अनेक नागरिकांना प्रतीक्षा करावी लागली. संपामुळे कार्यालयातील नियमित कामकाजावर परिणाम झाला असला, तरी नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी काही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात आल्याचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी निलेश धोटे यांनी सांगितले. उपलब्ध मर्यादित मनुष्यबळाच्या आधारे संपकाळातही नागरिकांना शक्य तितक्या सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, महाराष्ट्र राज्य मालवाहतूकदार संघटनेनेही संपाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

# महावितरणचा निष्काळजीपणा उघड

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील अत्यंत गजबजलेल्या टपाल नाका परिसरात महावितरणच्या मुख्य विद्युत वाहिन्या आणि डीपी अत्यंत घातक अवस्थेत उघड्यावर पडल्याचे समोर आले आहे. त्यामुळे येथे कधीही मोठी जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, जर कोणतीही दुर्दैवी घटना किंवा जीवितहानी घडल्यास संबंधित महावितरणच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी तीव्र मागणी पनवेलमधील स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

पनवेल शहराला देखणे आणि सुरक्षित करण्यासाठी लाखो रुपयांचा




निधी खर्च करून भूमिगत वीज वाहिन्या टाकण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला होता.

मात्र, टपाल नाका परिसरातील सद्यस्थिती पाहता हा प्रकल्प केवळ कागदावरच राहिला आहे की काय, असा प्रश्न पडत आहे. कोट्यवधी रुपये खर्च करूनही वीजवाहिन्या उघड्याच कशा, असा सवाल उपस्थित करत या संपूर्ण भूमिगत वाहिनी जोडणीच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा थेट आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कायदेतज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारे उघड्या तारांमुळे होणारा अपघात हा निव्वळ अपघाती नसून तो प्रशासकीय निष्काळजीपणाचा भाग मानला जातो. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने उघड्या पडलेल्या या वायरींमध्ये पाणी शिरून संपूर्ण परिसरात इलेक्ट्रिक शॉक पसरण्याचा प्रचंड धोका निर्माण झाला आहे. येथून हजारो नागरिक, शाळकरी मुले आणि वाहनांची सतत वर्दळ असते. एखादा मोठा अनर्थ घडण्यापूर्वी महावितरण यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महावितरण कार्यालयाला धडक

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल परिसरातील विजेच्या समस्यांसंदर्भात मविआच्या नगरसेवकांनी व पदाधिकाऱ्यांनी वीज वितरण कार्यालयात धडक देत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी स्थानिक नगरसेवक केतन भगत, लतिफ शेख, नगरसेविका आर्या जाधव, मनिषा म्हात्रे, प्रवीण जाधव, अनंत म्हात्रे, कडू, मयुरेश पाटील हे उपस्थित होते. त्यांनी वीज वितरण कंपनीचे अधिकारी अमित पवार यांची भेट घेऊन त्यांच्या समोर विजेच्या समस्या सोडवण्या संदर्भात चर्चा केली. ही चर्चा समाधानकारक ठरून येत्या १० दिवसांत कारवाई करण्याचे आश्वासन अधिकारी अमित पवार यांनी दिले.


## पंचशील नगरमध्ये वर्चस्वावरून राडा | सहाय्यक आयुक्तांच्या भूमिकेवर संशय

# नवीन पनवेलमध्ये टपऱ्यांचे उदंड पीक

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल परिसरात सध्या अनधिकृत टपऱ्या आणि हातगाड्यांचे उदंड पीक आले असून, संपूर्ण परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला आहे. केवळ एखादा विशिष्ट भागच नाही, तर नवीन पनवेलमधील विविध मुख्य रस्ते आणि पदपथांवर हीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. अपंगांच्या नावाखाली चालवल्या जाणाऱ्या बेकायदेशीर टपऱ्या आणि व्यवसायांमुळे स्थानिक रहिवासी आणि पादचाऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यातच आता या टपऱ्यांच्या वर्चस्वावरून गुन्हेगारीही डोके वर काढू लागली आहे.

काही दिवसांपूर्वीच पंचशील नगर परिसरात टपऱ्या कोणाच्या लावायच्या आणि जागा कोणाची, यावरून दोन गटांत जोरदार भांडणे झाली होती. या वादाचे पर्यवसान नंतर जबर मारहाणीत झाले असून, याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टपऱ्यांच्या या बेकायदेशीर व्यवसायाला आता गुन्हेगारीचे स्वरूप



येत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या संपूर्ण अनधिकृत टपऱ्यांच्या साम्राज्यामागे महिन्याला ५ ते ६ हजार रुपयांची हप्तेखोरी किंवा बेकायदेशीर भाडेवसुली सुरू असल्याची जोरदार चर्चा आहे. धक्कादायक बाब म्हणजे, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रूपाली माने या जेव्हा अतिक्रमण विरोधी कारवाईसाठी जातात, तेव्हा त्या या अनधिकृत टपऱ्यांवर ठोस कारवाई करण्याऐवजी तुम्ही कोणाला आणि किती हप्ते देता? याचीच विचारणा जास्त करत असल्याचा गंभीर आरोप आता समोर येत आहे. अधिकाऱ्यांच्या अशा भूमिकेमुळेच अतिक्रमण करणाऱ्यांचे धाडस अधिक वाढत चालल्याचे बोलले जात आहे.

यापूर्वी शिवा कॉम्प्लेक्सच्या बाहेरील टपऱ्यांवर प्रशासनाने कारवाई करत त्या हटवल्या होत्या. मात्र, प्रशासकीय यंत्रणेचा कोणताही धाक नसल्यामुळे अवघ्या काही दिवसांतच या टपऱ्या पुन्हा त्याच ठिकाणी थाटण्यात आल्या आहेत. शिवा कॉम्प्लेक्स आणि पंचशील नगर परिसराप्रमाणेच अभ्युदय बँक परिसरालाही या अतिक्रमणाचा मोठा विळखा बसला असून संपूर्ण नवीन पनवेलमध्येच ही समस्या आता अत्यंत गंभीर बनत चालली आहे.

अभ्युदय बँकेच्या समोर तर अपंगांच्या नावाखाली बेकायदेशीर टपऱ्यांची जणू साखळीच तयार झाली आहे. एकाच वेळी एवढे अपंग कुठून आले आणि त्यांना तिथे बसण्यासाठी जागा कोणी दिली? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. बाहेरून येणाऱ्या लोकांना अशा प्रकारे पैसे घेऊन जागा दिली जात असल्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या अडचणीत भर पडली आहे. त्यामुळे सिडको, महापालिका वरिष्ठ प्रशासन आणि पोलिसांनी या हप्तेखोरीची सखोल चौकशी करावी आणि संपूर्ण नवीन पनवेलमधील या टपऱ्यांच्या बेकायदेशीर साम्राज्याविरुद्ध धडक मोहीम उघडावी, अशी मागणी आता नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# आता रस्त्यावर उतरा

मोदी सरकारला बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सध्या स्वतःचेच कौतुक करून घेणे चालले आहे. सर्वाधिक काळ पंतप्रधानपदावर राहण्याचा नेहरुंचा विक्रमही मोदींनी मोडला आहे. मोदी हे नेहरुंपेक्षा किती महान आहेत असे सांगण्याची स्पर्धा लागली आहे. याच दरम्यान विरोधकांच्या इंडिया आघाडीची दिल्लीत बैठक झाली. मोदींच्या कारकीर्दीला एक तप पूर्ण झाले तसेच विरोधक म्हणून सर्व पक्षांचीही बारा वर्षे पूर्ण झाली. रामाला चौदा वर्षांचा वनवास पत्करावा लागला. पांडवांना तेरा वर्षांचा वनवास आणि एका वर्षाचा अज्ञातवास सहन करावा लागला. आजच्या विरोधकांची स्थिती तशीच झाली आहे. इंडिया आघाडीची बैठक चालू असतानाच तिकडे ममता बॅनर्जींच्या घरावर सीआयडीने पोलिस पाठवले आणि ममता व अभिषेक यांना पोलिसी कारवाईत अडकवण्याची सर्व तयारी केली. दुसरीकडे मध्य प्रदेशातून राज्यसभेसाठी अर्ज दाखल केलेल्या मीनाक्षी नटराजन यांच्याविरुध्दचे एक जुने प्रकरण उकरून काढण्यात आले. त्या प्रकरणात मीनाक्षी यांच्याविरुध्द एका व्यक्तीने तक्रार केली होती व न्यायालयाने मीनाक्षी यांच्याकडे त्यावर जबाब मागवला होता. मीनाक्षी यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा, फिर्याद किंवा न्यायालयातला खटला दाखल झालेला नव्हता. असे असूनही त्याचा उल्लेख मीनाक्षी यांच्या उमेदवारी अर्जात नसल्याचा खोटा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्याच्या आधारे निवडणूक आयोगाने त्यांचा अर्ज बाद ठरवला. म्हणजे आता कोर्टकचेऱ्या करणे आले. इडी, सीबीआय ते न्यायालय, निवडणूक आयोगाच्या प्रक्रिया वापरून घेऊन विरोधकांना नष्ट करणे हे भाजपचे उद्दिष्ट आहे. तरीही आपण लोकशाहीप्रेमी आहोत असा डिंडिम त्याला पिटायचा आहे. या वातावरणात एकत्र राहणे आणि विरोधाचे मुद्दे लावून धरणे हीसुध्दा एक कामगिरीच समजायला हवी. इंडिया आघाडीने तितकी ती नक्कीच केली आहे. पण आता वेगाने त्याच्या पुढे जाण्याची गरज आहे. दिल्ली बैठकीत २३ पक्ष सहभागी होते. द्रमुक आणि आम आदमी या दोन महत्वाच्या सदस्यांनी मात्र तिच्याकडे पाठ फिरवली होती. तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने द्रमुकला अचानक दगा दिला व विजय यांच्या टीव्हीकेशी हातमिळवणी केली. वास्तविक द्रमुक हा काँग्रेसचा भरवशाचा साथीदार होता. त्याची साथ सोडायची तर त्याला विश्वासात घ्यायला हवे होते.

## मुद्दे आले, पण कार्यक्रम हवा

केरळमध्ये कम्युनिस्ट सरकारवरही राहुल गांधी यांनी टोकाची टीका केली. परवा पिनाराई विजयन यांच्याविरुध्द पोलिसी कारवाई झाल्यावर तिचे स्वागत केले. हे इंडिया आघाडीच्या स्पिरीटला शोभणारे नाही. मात्र तरीही कम्युनिस्टांनी आघाडीचा धर्म सोडला नाही. त्यांनी दिल्ली बैठकीत काँग्रेसला चार शब्द मात्र जरूर ऐकवले. त्याचा काही उपयोग होईल अशी आशा आहे. दुसरीकडे आजवर परिघावर राहून काँग्रेसची गंमत पाहणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जींना अचानक इंडिया आघाडीची गरज भासू लागली आहे. बैठकीच्या दिवशी अगदी अलिकडे मतदारसंघांच्या फेररचनेबाबतचे म्हणजे डिलिमिटेशनचे विधेयक हाणून पाडण्यासाठी विरोधकांनी एक राहण्याची गरज होती. तेव्हा आपले खासदार निवडणूक प्रचारात व्यग्र असल्याने येणार नाहीत असा अपशकून करण्याचा प्रयत्न तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी आरंभी केला होता. नंतर बरीच मनधरणी केल्यावर ते बदलले. आता त्याच तृणमूलची सत्ता गेली, आमदार फुटले, पक्षचिन्ह जाण्याची वेळ आली आणि ममता ऐन दिल्लीत असताना खासदारही फुटले. त्यामुळे ममतांची स्थिती केविलवाणी झाली आहे. भाजप सरकारचे विरोधक म्हणून वावरणे दिवसेंदिवस किती अशक्यप्राय होऊ लागले आहे याचे हे ताजे उदाहरण होते. या स्थितीत इंडिया आघाडीच्या बैठकीत फार ठोस काही घडण्याची अपेक्षा नव्हतीच. मात्र इतक्या पक्षांनी, आपले आपापल्या राज्यातले अस्तित्व टिकवण्यासाठी का होईना पण, एक राहण्याचा संकल्प करणे हीच महत्वाची गोष्ट आहे. इंडिया आघाडीच्या बैठका वरचेवर व्हायला हव्यात असे तिच्या समर्थकांचे पूर्वीपासूनच म्हणणे होते. आता ते नेत्यांनाही पटले आहे. त्यानुसार दर दोन महिन्यांनी बैठका घेण्याचे ठरले आहे. अशा बैठका व चर्चा गंभीरपणे झाल्या तरच भाजपला विरोध करण्याचा काही देशव्यापी कार्यक्रम आकार घेऊ शकतो. २०२९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपला तोंड देण्यासाठी किमान उभे राहण्यासाठी हे आवश्यक आहे. दिल्ली बैठकीअखेरीस पाच मुद्द्यांवर एकमत झाले. मतदारयाद्यांची सखोल तपासणी करण्याच्या मोहिमेबाबत सरन्यायाधीशांना पत्र लिहिणे आणि नीट प्रश्नी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणे यांचा त्यात समावेश आहे. यातील प्रधानांच्या राजीनाम्यासाठी व परिक्षांमधील घोटाळ्यांविरोधात काँग्रेसने देशभर आंदोलने केली असली तरी कॉकरोच जनता पार्टीने हा विषय अधिक गाजवला आहे. त्यामुळे उद्या समजा प्रधानांना हलवण्यात आलेच तर त्याचे श्रेय झुरळांना जाईल.

## एकदिलाने लढण्याची गरज

मतदारयादीच्या तपासणीचा मुद्दा अत्यंत गंभीर आहे. पण सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच त्यावर शिक्कामोर्तब करून झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये २७ लाख मतदारांना क्षुल्लक कारणांवरून वगळले जाऊनही न्यायालयाने आपले वजन निवडणूक आयोगाच्या पारड्यातच टाकले. त्यामुळे आता सरन्यायाधीशांना पत्र लिहून फार काही साध्य होईल असे नाही. यावर एकाच इलाज आहे. लोकांपर्यंत जाणे, त्यांची मते कशी गायब होत आहेत हे त्यांना पटवणे आणि रस्त्यावर कडवे आंदोलन उभारणे. दुर्दैवाने देशभरात सोडाच, पण एखाद्या राज्यातही असे आंदोलन उभारण्यात इंडिया आघाडी अयशस्वी ठरली आहे. राहुल गांधींनी मतचोरीचा मुद्दा मिडियासमोर मांडला. त्याला भरपूर प्रसिध्दी मिळाली. पण आधी बिहार व नंतर बंगालच्या निवडणूक प्रचारात काँग्रेसला तिचा फायदा घेता आला नाही. महाराष्ट्रात मारकडवाडीचे लोक फेरमतदानाची मागणी करत असताना काँग्रेसवाले त्यांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले नव्हते. या स्थितीत लोकांना पेटवणारे विषय घेणे आणि त्यातून एक लाट उत्पन्न करणे याचा विरोधकांना खूप रियाझ करावा लागणार आहे. आखाती युध्दाच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदींनी जगात भारताची पत घालवून टाकली आहे असा आरोप विरोधक वारंवार करतात. ते एक ठीक आहे. पण पेट्रोल व गॅसचे भाव भडलेलेल असताना इंडिया आघाडीला त्याविषयी लोकांना रस्त्यावर खेचून का आणता आले नाही यावर त्यांनी अधिक चिंतन करण्याची गरज आहे. एकीकडे इंडिया आघाडीची बैठक होत असतानाच दिल्लीतल्या भारत मंडपममध्ये मोदी सरकारला बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल उत्सव चालू होता. त्याला सर्व नामवंत पत्रकार हजर राहतील व इंडिया आघाडीच्या बैठकीकडे दुर्लक्ष होईल याची पध्दतशीर व्यवस्था यातून करण्यात आली. मोदी सरकार विरोधकांचा इतका बारीकसारीक पातळीवर जाऊन बंदोबस्त करत असताना इंडिया आघाडीला आपण एकत्र आहोत यात समाधान मानणे पुरेसे नाही. तर, भाजपला संसदेत, प्रशासनात, बाहेर रस्त्यावर अशा सर्व ठिकाणी भिडण्याचा व्यापक कार्यक्रम तातडीने हाती घ्यावा लागेल. त्यासाठी आपसातले मतभेद मिटवावे लागतील. इंडिया आघाडीच्या पुढच्या बैठकीत अधिक द्रमुक व आम आदमींना सहभागी करून घेऊन अधिक ठोस कार्यक्रम समोर येईल अशी आशा आहे.

---

**| विचार**

# दारूकांडातील खुनी कोण?

*पुण्यात विषारी दारूमुळे झालेल्या मृत्यूंची बातमी समोर आली, की पहिली प्रतिक्रिया संतापाची असते. बेकायदेशीर दारू विकणाऱ्यांविषयी चीड, प्रशासनाच्या निष्काळजीपणाविषयी संताप आणि मृत्यूच्या या भीषण मालिकेविषयी हळहळ दिसते; मात्र या दुर्घटनांमध्ये खरा खुनी कोण, मिथाईल अल्कोहोल, बेकायदेशीर दारू उत्पादक की प्रशासन की मग या सर्वांच्या मागे दडलेली गरिबी, असमानता आणि सामाजिक उपेक्षा?*

**जनार्दन पाटील**

पुणे आज जागतिक नकाशावर झळकत आहे. 'आयटी पार्क', उंच इमारती, मेट्रो, द्रुतगती महामार्ग आणि कोट्यवधी रुपयांच्या गुंतवणुकीमुळे विकासाचे चित्र रंगवले जाते; परंतु या विकासाच्या झगमगाटाच्या सावलीत हजारो मजूर, स्थलांतरित कामगार आणि रोजंदारीवर जगणारे नागरिक आहेत. शहर उभे करणारे हात मात्र स्वतःच्या आयुष्याचे ओझे वाहण्यात थकून गेलेले दिसतात. विषारी दारूचे बळी प्रामुख्याने याच वर्गातून येतात, हा योगायोग नाही. सुस्थितीत असलेला समाजातील एक वर्ग संध्याकाळी क्लबमध्ये किंवा महागड्या रेस्टॉरंटमध्ये पेय घेतो. त्याच शहरात एखादा मजूर दिवसाचे बारा-चौदा तास कष्ट करून शंभर-दोनशे रुपयांच्या नशेत स्वतःचे दुःख विसरण्याचा प्रयत्न करतो. दोघेही दारू पितात; पण एकाला ती मनोरंजन वाटते, तर दुसऱ्यासाठी ती वास्तवापासून पलायनाची वाट असते. त्यामुळे विषारी दारूच्या प्रश्नाकडे केवळ व्यसन म्हणून पाहणे अपुरे ठरेल. तो सामाजिक निराशेचा आणि आर्थिक असुरक्षिततेचा प्रश्न आहे. विषारी दारू पिणारा माणूस मृत्यू ओढवून घेण्यासाठी पित नाही. उलट, त्याला जगायचे असते. दुसऱ्या दिवशी पुन्हा कामावर जायचे असते. कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा असतो; परंतु स्वस्तात उपलब्ध असलेल्या दारूमध्ये मृत्यू दडला आहे, याची त्याला कल्पनाही नसते. त्याची निवड अनेकदा गरिबीने ठरवलेली असते. महागडी दारू त्याच्या आवाक्याबाहेर असते आणि आयुष्यातील नैराश्य त्याला स्वस्त पर्यायाकडे ढकलते.

भारतातील बहुतेक विषारी दारू दुर्घटनांचा इतिहास पाहिला, तर एक गोष्ट स्पष्ट होते. मृत्यू नेहमी गरीबांच्या वस्त्यांमध्ये होतात. झोपडपट्ट्या, कामगार वसाहती, ग्रामीण भाग किंवा शहराच्या उपेक्षित कोपऱ्यांमध्येच हे बळी आढळतात. उच्चभ्रू भागात अशा दुर्घटना क्वचितच घडतात. कारण समस्या दारूची नाही; समस्या सामाजिक विषमतेची आहे.

पुण्यातील ताज्या दुर्घटनेने आणखी एक कटू सत्य समोर आणले आहे. शहराच्या आर्थिक आणि मानवी विकासातील अंतर वाढत चालले आहे. एखाद्या शहरात मेट्रो धावते म्हणून ते विकसित होत नाही. तेथील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारते, तेव्हा विकासाला अर्थ प्राप्त होतो. हजारो कामगार अजूनही असुरक्षित, असंघटित आणि सामाजिक संरक्षणापासून वंचित असतील, तर विकासाच्या दाव्यांमध्ये मोठी पोकळी आहे. या दुर्घटनांमध्ये प्रशासनाची जबाबदारी नाकारता येणार नाही. विषारी दारूचा व्यवसाय एका दिवसात उभा राहत नाही. त्यासाठी उत्पादन, वाहतूक, वितरण आणि विक्री यांचे संपूर्ण जाळे कार्यरत असते. स्थानिक पातळीवर अनेकांना त्याची माहिती असते, तरीही वर्षानुवर्षे हे उद्योग सुरू राहतात. दुर्घटना घडल्यानंतर अचानक छापे पडतात, अटकसत्र सुरू होते आणि काही काळानंतर सर्व काही पूर्ववत होते. ही पद्धतच अपयशी ठरल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे; मात्र प्रशासनावर टीका करून प्रश्न सुटणार नाही. समाजालाही आत्मपरीक्षण करावे लागेल. आपण कामगारांच्या जीवनाकडे किती गांभीर्याने पाहतो, त्यांच्या मानसिक आरोग्याविषयी, निवासाविषयी, कौटुंबिक समस्यांविषयी आणि व्यसनमुक्तीविषयी किती चर्चा करतो? एखादा मजूर मृत्युमुखी पडल्यावर दोन दिवस सहानुभूती व्यक्त होते; पण त्याच्या जिवंतपणीच्या संघर्षाकडे समाजाचे फारसे लक्ष नसते.

विषारी दारूचे बळी गेल्यानंतर सर्वाधिक दुःख त्यांच्या कुटुंबियांना भोगावे लागते. घरातील कमावता पुरुष किंवा स्त्री गेल्यानंतर संपूर्ण संसार उद्ध्वस्त होतो. मुलांचे शिक्षण अर्धवट राहते. कुटुंबावर कर्जाचा डोंगर उभा राहतो. काही कुटुंबांना गावाकडे परतावे लागते. अनेक महिलांना असंघटित क्षेत्रात अत्यल्प मजुरीवर काम करण्यास भाग पडते. एका व्यक्तीचा मृत्यू अनेक आयुष्यांवर परिणाम करून जातो. खरे तर या घटना आरोग्य, रोजगार आणि सामाजिक न्याय यांच्या संगमावर उभ्या आहेत. सरकारने केवळ कायदेशीर कारवाईवर भर न देता कामगारांसाठी अधिक व्यापक धोरण आखले पाहिजे. परवडणारी घरे, आरोग्य सेवा, समुपदेशन केंद्रे, व्यसनमुक्ती कार्यक्रम आणि सामाजिक सुरक्षा यांचे मजबूत जाळे उभारले पाहिजे. अन्यथा, विषारी दारूचा व्यवसाय थांबला तरी त्यामागील कारणे कायम राहतील. समाज म्हणून आपल्यालाही हा प्रश्न नैतिकतेच्या चौकटीतून बाहेर काढावा लागेल. 'दारू पिऊन मेला' या एका वाक्यात आपण अनेकदा मृत व्यक्तीला दोषी ठरवून मोकळे होतो; पण त्याच्या मृत्यूमागील सामाजिक परिस्थिती, आर्थिक विवंचना आणि व्यवस्थेचे अपयश यांचा विचार करत नाही. त्यामुळेच प्रत्येक दुर्घटनेनंतर काही दिवस चर्चा होते आणि नंतर विस्मरण. पुण्यातील विषारी दारू दुर्घटना आपल्याला एक कठोर प्रश्न विचारते, शहरे नेमकी कोणासाठी विकसित होत आहेत? चमकदार इमारतींसाठी की त्यांना उभारणाऱ्या श्रमिकांसाठी? माणूस विकासाच्या केंद्रस्थानी नसेल, तर तो विकास कितीही भव्य असला तरी अपूर्णच राहतो.

विषारी दारूमुळे झालेले मृत्यू ही केवळ गुन्हेगारी घटना नाही. ती समाजाच्या विवेकाला दिलेली धोक्याची घंटा आहे. कारण अशा प्रत्येक मृत्यूमागे एक न बोललेला संदेश असतो, तो म्हणजे माणूस दारूमुळे मरत नाही, तो अनेकदा गरिबी, उपेक्षा आणि असमानतेमुळे आधीच अर्धा मेलेला असतो. तांत्रिकदृष्ट्या पाहता या दुर्घटनांमागे मिथाईल अल्कोहोल हे मुख्य रसायन असते. निव्वळ जास्त नफा कमावण्यासाठी दारूमध्ये होणारी मिथाईल अल्कोहोलची सरमिसळ मानवी शरीरासाठी प्राणघातक ठरते. पोटात गेल्यावर यकृतामध्ये या रसायनाचे रूपांतर 'फॉर्मिक ॲसिड'मध्ये होते, ज्यामुळे माणसाचे अंतर्गत अवयव निकामी होतात, दृष्टी जाते आणि अत्यंत वेदनादायी मृत्यू येतो. हा सगळा काळाबाजार प्रशासनाला माहीत नसतो का? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. ज्या पुण्यात आणि पिंपरी-चिंचवड परिसरात ही दुर्घटना घडली, तिथे औद्योगिक कारखान्यांसाठी मोठ्या प्रमाणावर मिथाईल अल्कोहोल आयात केले जाते. या रासायनिक साठ्यावर राज्य उत्पादन शुल्क आणि पोलिसांचे कडक नियंत्रण असणे कायद्याने बंधनकारक आहे; परंतु प्रत्यक्षात काय घडते? रासायनिक गोदामांमधून छुप्या मार्गाने हे विष दारू माफियांच्या हातात पोहोचते. अत्यंत कमी खर्चात तीव्र नशा देणारी दारू तयार करण्यासाठी माफिया याचा वापर करतात. शासकीय अधिकाऱ्यांचे खिसे गरम करून हे अवैध अड्डे राजरोस चालवले जातात. हा निव्वळ नफ्याचा आणि भ्रष्टाचाराचा एक रक्तरंजित खेळ आहे, ज्याची किंमत गरिबांना आपल्या प्राणाने मोजावी लागते.

बिहार किंवा गुजरातमध्ये दारूबंदी असल्यामुळे छुप्या मार्गाने विषारी दारू विकली जाते आणि लोक मरतात, असा एक युक्तिवाद नेहमी केला जातो; पण महाराष्ट्रात, जिथे चंद्रपूर आणि वर्धासारखे जिल्हे वगळता दारूबंदी नाही, तिथे पुण्यात एवढा मोठा अनर्थ कसा घडला? याचे उत्तर एकाच शब्दात आहे- 'हप्तेखोरी'. प्रत्येक गावात, तालुक्यात आणि शहराच्या झोपडपट्टी भागात हातभट्ट्या कुठे चालतात, हे गल्लीतील लहान मुलालाही माहीत असते. मग स्थानिक पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाला ते का माहीत नसावे? अशा दुर्घटना घडतात, तेव्हा सरकार तातडीने काही पावले उचलते. काही कनिष्ठ दर्जाच्या पोलिसांचे किंवा अधिकाऱ्यांचे निलंबन केले जाते. मृतांच्या नातेवाईकांना काही लाखांची मदत जाहीर करून सरकार आपले हात झटकून घेते. काही दिवस अवैध अड्ड्यांवर थातूरमातूर छापे टाकले जातात; परंतु मूळ समस्येला कधीच हात घातला जात नाही. दारू माफियांचे आणि स्थानिक राजकीय नेत्यांचे लागेबांधे इतके घट्ट असतात, की काही दिवसांमध्येच हे 'सत्र' पुन्हा पूर्ववत सुरू होते. पुण्यातील घटनेने सिद्ध केले आहे, की राज्याचे गृहखाते आणि उत्पादन शुल्क विभाग केवळ महसूल गोळा करण्यात आणि राजकीय साठमारीत मग्न आहेत. सर्वसामान्यांच्या जिवाशी त्यांना काहीही देणेघेणे नाही. या भीषण दुर्घटनेत सरकारच नाही, तर सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि तथाकथित विचारवंतही अपयशी ठरले आहेत. एके काळी महाराष्ट्रात दारूबंदीसाठी महिलांनी लाटणे मोर्चे काढले, उग्र आंदोलने केली. आज त्या सामाजिक चळवळी कुठे गायब झाल्या आहेत?

शहरातील सुखवस्तू वर्गाच्या समस्यांवर चर्चासत्रे घडवून आणणाऱ्या 'एनजीओं'ना झोपडपट्ट्यांमधील हा जळणारा संसार का दिसत नाही? मजूर वर्गामध्ये व्यसनाधीनता का वाढते आहे, याच्या मुळाशी जाण्यात आपण अपयशी ठरलो आहोत. केवळ 'दारू पिणे वाईट आहे' असे फलक लावून किंवा भाषणे ठोकून व्यसनमुक्ती होत नाही. मजुरांचे मानसिक आरोग्य, त्यांचे राहणीमान, त्यांच्या मनोरंजनाची साधने आणि त्यांच्या कौटुंबिक समस्या यावर काम करण्याची गरज आहे. सामाजिक संस्था आज केवळ सरकारी अनुदाने आणि कॉर्पोरेट फंड मिळवण्यात व्यस्त आहेत, तर जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा दुष्काळ पडला आहे. ही सामाजिक पोकळीच दारू माफियांसाठी सुपीक जमीन ठरत आहे.

---

**| चर्चा आजची**

# मर्यादित पगार अन् अफाट महागाई

**वैभव पाटील**

आखाती देशातील युद्धाचा मोठा फटका भारतीय अर्थव्यवस्थेला बसण्याची चिन्हे दिसत आहेत. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना प्रत्येक गोष्टीत काटकसर करण्यास सांगितली आहे. तसेच, इंधन दरवाढीचा सर्वात मोठा परिणाम सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होतो. पेट्रोल-डिझेल महागले की वाहतूक खर्च वाढतो. त्याचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंवर होतो. आधीच बेरोजगारी, पगारातील अस्थिरता आणि वाढता जीवनशैलीचा खर्च यामुळे त्रस्त असलेल्या मध्यमवर्गासाठी ही परिस्थिती अधिक कठीण बनते. त्यामुळे ''मर्यादित पगार अन् अफाट महागाई'' अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा सर्वसामान्य जनतेमधून होत आहे.

सध्या भारत देश महागाईची झळ सोसत आहे. आखाती देशातील युद्धांमुळे इंधनाच्या दरात वाढ होत आहे. त्याचा परिणाम भाज्या, धान्य, दूध, बांधकाम साहित्य यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंवर होतो. बाजारातील प्रत्येक वस्तूच्या किंमतीत वाढ होऊ लागते. आधीच बेरोजगारी, पगारातील अस्थिरता आणि वाढता जीवनशैलीचा खर्च यामुळे त्रस्त असलेल्या मध्यमवर्गासाठी ही परिस्थिती अधिक कठीण बनते. शेतकऱ्यांवरही या दरवाढीचा मोठा परिणाम होतो. ट्रॅक्टर, पंप, मालवाहतूक यांच्यासाठी डिझेल अत्यावश्यक आहे. डिझेल दरवाढीमुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढतो. परंतु, बाजारात पिकांना तितका दर मिळत नाही. परिणामी शेतकरी आर्थिक कोंडीत सापडतो. वाहतूकदारांचे भाडे वाढते, बससेवा आणि मालवाहतूक महाग होते. शेवटी याचा फटका पुन्हा ग्राहकांनाच बसतो.

तज्ज्ञांच्या मते, वाहतूक खर्च वाढल्याने अनेक वस्तूंच्या किमती टप्प्याटप्प्याने वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः दैनंदिन वापराच्या वस्तू क्षेत्रावर याचा मोठा परिणाम होऊ शकतो. दुधाच्या किमती वाढण्याचे संकेत आधीच दिसू लागले आहेत. वाढलेला वाहतूक व परिचालन खर्च लक्षात घेता काही कंपन्यांनी



यापूर्वीच दरवाढ केली आहे. त्यामुळे दही, लोणी, पनीर, चीज आणि आईस्क्रीम यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांच्या किमतींवरही परिणाम होऊ शकतो. भारताची अन्नपुरवठा साखळी मोठ्या प्रमाणावर रस्ते वाहतुकीवर अवलंबून आहे. भाजीपाला, फळे, धान्य, कडधान्ये आणि पॅकेज्ड फूड यांची वाहतूक महागल्यास त्याचा थेट परिणाम ग्राहकांच्या खिशावर होऊ शकतो. त्यामुळे 'मर्यादित पगार अन् अफाट महागाई' अशा कात्रीत सामान्य माणूस सापडला असून, या दरवाढीचे तीव्र पडसाद सोशल मीडियावर उमटत आहेत. इंधन महागल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची भीती असून, सर्वसामान्यांचे आर्थिक गणित विस्कळीत होत आहे. दरवाढीचा निर्णय जाहीर होताच सोशल मीडियावरून आणि प्रत्यक्ष स्तरावर तीव्र संताप व्यक्त होत आहे. ठराविक वेतनात वाढीव खर्चाचा मेळ कसा घालावा, असा यक्षप्रश्न नोकरदारांपुढे उभा आहे. तसेच, महिन्याभरात तीन ते चार वेळा इंधन टंचाईच्या अफवेने पंपांवर मोठी गर्दी झाल्याच्या घटना घडत आहेत. वाढत्या इंधन दरांचा परिणाम फूड डिलिव्हरी, ई-कॉमर्स, कुरिअर सेवा, टॅक्सी आणि बस प्रवासाच्या खर्चावर होऊ शकतो. ग्राहकांना जास्त डिलिव्हरी शुल्क, कमी ऑफर्स किंवा वाढीव सेवा शुल्क सहन करावे लागू शकते.

अर्थतज्ज्ञांच्या मते, जर इंधनाचे दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहिले, तर महागाई वाढून सामान्य कुटुंबांच्या मासिक बजेटवर अतिरिक्त ताण पडू शकतो. आज चारजणांच्या एका कुटुंबाला रोजच्या भाजीपाल्यासाठी जवळपास १०० रुपये म्हणजे महिन्याकाठी ३ हजार रुपये खर्च करावे लागत आहेत. दीड-दोन वर्षापूर्वी शंभर रुपयांखाली असणाऱ्या डाळी १८० ते २०० रुपये किलोवर पोहोचल्या आहेत. महिन्याला चार किलो डाळी वापरणाऱ्या कुटुंबाला यासाठी ७०० ते १ हजार रुपये खर्च करावा लागत आहे. खाद्यतेलाचे भाव पाहिल्यास तेही १२० ते २०० रुपयांवर पोहोचले आहेत. गॅस सिलिंडरचा दर ८०० पेक्षा जास्त आहे. विजेचे दर वाढवल्यानंतर मध्यमवर्गीय कुटुंबाची महिन्याची लाईट बिले ७०० ते १ हजार रुपयांवर गेल्याचे दिसून आले आहे. म्हणजेच ७ ते ८ हजार रुपये केवळ या चार-पाच गोष्टींवर खर्च होताहेत. याखेरीज दुधासाठी २ हजार रुपये (७० रुपये प्रतिलिटर), पेट्रोल १०० रुपये प्रतिलिटर अशी भली मोठी यादी सामान्यांचा खिसा रिकामा करत आहे. परिणामी, आतापर्यंत किलोने विकल्या जाणाऱ्या भाज्या आता पावकिलोने खरेदी कराव्या लागत आहेत. नागरिक भाजीपाला खरेदीसाठी पिशवी सोबत घेऊन जातात खरे; परंतु परतताना ती पिशवी बहुतांशी रिकामीच असते.

मध्यंतरी तांदळाचे भाव वाढल्याने सरकारने तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली. परिणामी, काहीअंशी तांदळाच्या किमतीवर नियंत्रण आले. मात्र, अन्य वस्तूंचे भाव मात्र वाढलेलेच आहेत. आतापर्यंत पावसाळी वातावरणामुळे डाळ, राजमा, वाटाणे यासारख्या वस्तूंचे भाव वधारलेले दिसत होते. आता किरकोळ बाजारात टोमॅटो १०० रुपये किलो, हिरवी मिरची १५० रुपये किलो, कांदे-बटाटे ५०-५० रुपये किलो दराने विकले जात आहेत. भेंडी, वांगी तर ८० रुपये किलोपर्यंत पोहोचली आहेत. ४०० रुपये किलोवर गेलेला लसूण आजही तेथेच आहे. अशा स्थितीत नोकरदारांनी जगायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

---

**लोकसंसद**

## देशातील प्रजनन दर घसरला ... जन्म दरात वेगाने घट

भारताच्या नमुना नोंदणी प्रणाली नुसार देशाचा एकूण प्रजनन दर २०२४ पर्यंत १.९ पर्यंत घसरला आहे. लोकसंख्या स्थर्य पातळीखाली म्हणजेच २.१ खाली येण्याची ही वेळ पहिलीच आहे. देशातील सर्व राज्याचा विचार करता बिहार राज्य हे प्रजनन दारात सर्वात जास्त आहे. आकडेवारीनुसार बिहार या राज्यात प्रजनन दर २.९ एवढा आहे. मध्य प्रदेश, राजस्थान,छत्तीसगड, झारखंड या राज्यात प्रजनन दर लोकसंख्या स्थर्य पातळीपेक्षा जास्त आहे. एकूणच देशातील एकूण सहा राज्यात प्रजनन दर २.१ पेक्षा जास्त आहे. केरळ, पश्चिम बंगाल, तामिळनाडू या राज्यात तो १.३ एवढा आहे. देशातील प्रजनन दर घसरल्याने त्याचे परिणाम उद्योगावर होऊ शकतात. उद्योगांना माणसांची कमतरता भासेल. देशात तरुणांची संख्या कमी होऊन वृद्ध लोकांची संख्या वाढत जाईल. त्यामुळे सामाजिक समतोल व कौटुंबिक समतोल ढळेल देशातील तरुण लोकांची संख्या कमी झाल्याने उद्योगाला वाईट दिवस येतील. आज चीन किन्वा जपान या राष्ट्रात हा प्रश्न भेडसावत आहे. भारतात आंध्र प्रदेशात सध्या दोन किंवा तीन मुले जन्माला घातल्यास त्यास प्रोत्साहनपूर्वक काही रक्कम दिली जाणार आहे प्रजनन दर घटल्यास भारताची लोकसंख्या हळू हळू कमी होण्याच्या मार्गावर राहील. आज जपान मध्ये ही परिस्थिती चालू आहे एकूणच या प्रस्नाकडे सरकारने लक्ष देऊन काय उपाय योजना करणे आवश्यक आहे त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

---

**| दिनविशेष**

# थोर स्वातंत्र्य सैनिक सानेगुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार, ठाणे**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

११ जून
१) श्री. गंगाधर तुकाराम राऊत अलिबाग, ११-६-१९४४
२) श्रीम. सुषमा अशोक सोमण अलिबाग, ११-६-१९५१
३) श्री. सुरेश दत्तात्रेय वालेकर अलिबाग, ११-६-१९४९

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**लीला व मधुकर विष्णू वार्डे, स्मरणार्थ अलिबाग**

**रत्नप्रभा वामन पाटील, अलिबाग**



**श्रीमती माया मोरे, उप विभागीय पोलीस अधिकारी अलिबाग विभाग, वाढदिवस**

# जाहिरातींमुळे नेरळ स्थानक विद्रूप

## ● जागोजागी स्टिकर लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ रेल्वे स्थानकात काही अज्ञात लोकांनी जाहिरातीचे स्टिकर लावले. हे स्टिकर अख्या नेरळ स्थानकात जागोजागी लावण्यात आले आहेत. त्यामुळे नेरळ स्थानकाचे सौंदर्य नष्ट झाले आहे. नेरळ स्थानक परिसर विद्रूप करणाऱ्या जाहिरातीमधील संबंधित कंपनीवर रेल्वेने गुन्हा दाखल करावा, अशी मागणी काही प्रवासी आणि नेरळ प्रवासी संघटनेने केली आहे.




कोणत्याही रेल्वे स्थानकात जाहिरात फलक लावण्याचे कंत्राट मध्य रेल्वेकडून दिले जातात. त्यात उपनगरीय लोकलमधील जाहिराती यांचा देखील समावेश असून उपनगरीय लोकलमध्ये परवानगीविना आपल्या संस्थेची जाहिराती करणारे स्टिकर लावणाऱ्यावर कारवाई केली जात असल्याने असे बेकायदा स्टिकर लावण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्याचप्रकारे कोणत्याही स्थानकात असे बेकायदा फलक लावण्याचे प्रमाण नगण्य आहे. मात्र नेरळसारख्या मध्य रेल्वेवरील नव्याने मेकओव्हर केलेल्या जंक्शन रेल्वे स्थानकात दोन दिवसात असंख्य जाहिरात स्टिकर लावण्यात आले. घडी पॅकिंग या व्यवसायाची जाहिरात करणारे स्टिकर नेरळ स्थानकात जागोजागी लावले आहेत. त्याचा परिणाम चांगले सुसज्ज बनलेल्या नेरळ स्थानकात जागा मोकळी आहे तेथे हे स्टिकर लावले गेले आहेत. त्यामुळे नेरळ स्थानक विद्रूप झाले आहे. लिफ्टमध्ये, पादचारी पुलावर तसेच स्काय वॉकवर याशिवाय तिकीट घराजवळदेखील असे स्टिकर लावले गेले आहेत. कोणत्याही रंगीबेरंगी पद्धतीने बनवलेले जाहिरात स्टिकर नाहीत, तर साधी झेरॉक्स कॉपी स्वरूपातील हे स्टिकर आहेत. त्या स्टिकरमुळे नेरळ स्थानकाचे सौंदर्य बिघडले आहे.

हे स्टिकर लावले जात असताना रेल्वेच्या सुरक्षा यंत्रणेला दिसले नाही, याचे सर्वाधिक नवल प्रवासी व्यक्त करीत आहेत. स्थानकात आरपीएफ आणि जीआरपी तसेच होमगार्ड देखील तैनात असतात. अशावेळी कोणालाही त्या स्टिकर लावणाऱ्यांचा थांगपत्ता लागला नाही हे शक्य नाही, अशी टीका प्रवाशांनी केली आहे. स्थानकातील अधिकाऱ्यांना हाताशी धरूनच अशा जाहिराती कोणत्याही परवानगी विना लावल्या जाऊ शकतात. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे यांच्यात बघून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.


> **नेरळ स्थानकात या जाहिराती कोणी लावल्या याबाबत माहिती घेत असून संबंधितांची माहिती मिळाल्यावर कारवाई करण्यावर संबंधित विभागाला सूचित केले जाईल.**
> **– गणपत पाटील, स्थानक प्रबंधक**

तर 'घडी पॅकिंग' अशी जाहिरात करणाऱ्या जाहिरात स्टिकरवर असलेल्या फोन नंबरवर अनेक प्रवाशांनी संपर्क केला असता तुम्ही कुठेही तक्रार करा, अशी उलट धमकी त्या नंबर वर बोलणारी महिला नेरळ स्थानकातील प्रवाशांना देत होती. त्यामुळे त्या व्यक्तीवर आधी कारवाई करावी, अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेने नेरळ स्थानक प्रबंधक यांच्याकडे केली आहे.

## वीज देयके दुरूस्तीसाठी विशेष कक्षाची स्थापना

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

बदलापूर परिसरातील वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. प्रामुख्याने स्मार्ट मीटरमुळे वाढीव वीज देयके आली, हा खोडसाळ प्रचार खोडून काढण्यासाठी या कक्षाची स्थापना केली आहे.



महावितरणच्या बदलापूर विभागाचे कार्यकारी अभियंता आनंद काटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या स्थितीत वीज ग्राहकांच्या वाढीव वीज देयके आणि स्मार्ट मीटर संदर्भात शंकांचे निरसन करण्यासाठी दोन अभियंता, ५ जनमित्र आणि एक उच्चस्तर लिपिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कक्षात कार्यरत अभियंता आणि कर्मचारी येणाऱ्या ग्राहकांच्या वीज देयकांची तपासणी करून शंका निरसन करतील तसेच आवश्यक वाटल्यास वीज मीटरची तपासणी करण्यात येणार आहे.

## उरणमध्ये शेती मशागतीची लगबग

**। उरण । प्रतिनिधी ।**

मृग नक्षत्राच्या आगमनाची चाहूल लागताच आणि पावसाळा जसा जवळ येऊ लागला आहे, तशी उरण तालुक्यातील बळीराजाची शेतांची मशागत करण्यासाठी लगबग सुरू झाली आहे.



शेताचे बांध व्यवस्थित करणे, बांधांच्या खांडी बुजवणे, भात रोपांच्या वाफ्यांसाठी राब भाजणे आणि शेतातील कचरा-घाण वेचून जमीन साफ करणे अशा विविध कामांमध्ये सध्या शेतकरी गुंतले आहेत. सध्या उन्हाचा कडाका तीव्र असतानाही, त्याची तमा न बाळगता या हंगामात पुन्हा एकदा या काळ्या मातीतून सोने उगविण्यासाठी येथील शेतकरी शेतात घाम गाळताना दिसत आहेत. तालुक्यातील खाडी पट्ट्यातील काही शेतकऱ्यांनी आधीच सुक्या भात पेरणीची आणि मशागतीची कामे वेगाने सुरू केली आहेत. दुसरीकडे, गोड्या पाण्याच्या भागातील शेतकऱ्यांनी अजून पेरणीला सुरुवात केली नसली, तरी मान्सून कधी सक्रिय होतोय याकडे त्यांचे डोळे लागले असून, पावसाचा अंदाज घेऊनच ते पेरणी करणार आहेत.

बेभरवशी हवामान, महागडे बियाणे, खते आणि कीटकनाशके अशा अनेक आव्हानांचा सामना करत, या वर्षी मागील वर्षापेक्षा जास्त भाताचे उत्पादन घ्यायचे, हे ध्येय उराशी बाळगून उरणचा शेतकरी सज्ज झाला आहे.

## मोफत नेत्र तपासणी शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१०) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ३० रुग्णांची तपासणी करून १४ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.



माणगावात गेली तीन वर्षांहून अधिक काळात ४८ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत ४०२४ हून अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजयशेठ मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात. नेत्ररोग शिबिराला दरमहिन्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ गरीब जनता घेत आहे.

## मुंबई–गोवा महामार्गावरील बुजवला खड्डा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील मुंबई–गोवा महामार्गावरील मोर्बा रोड कॉर्नर येथे पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या खड्ड्यामुळे अपघात आणि वाहनांचे नुकसान होण्याच्या घटना घडत असल्याने माजी ग्रामपंचायत सदस्य रणधीर कनोजे यांनी पुढाकार घेत हा खड्डा बुजविला.



कनोजे यांनी शुक्रवारी (दि.५) सिमेंट व रेतीच्या साहाय्याने संबंधित ठिकाणचा खड्डा भरून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. महामार्गावरील या समस्येकडे अनेक महिन्यांपासून दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी होती. मोर्बा रोड परिसरातील खड्डा बुजविल्यामुळे प्रवासी, वाहनचालकांनी कनोजे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

## अलिबाग शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**अलिबाग :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अलिबाग येथील शासकीय मुलांचे व मुलींचे वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण विभागाने केले आहे. वसतिगृहांमध्ये राहण्याची, भोजनाची तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात राहण्याची सोय मिळावी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण सुलभ व्हावे, हा या योजनेचा उद्देश आहे. प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज संबंधित वसतिगृह कार्यालयात सादर करावेत. तसेच, जागा मर्यादित असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज करावेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## चिरनेरमध्ये नालेसफाईच्या कामांना वेग

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे, यासाठी चिरनेर गावातील नाले सफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू करण्यात आली आहेत. नाल्यातील गाळ काढण्याच्या कामास अखेर सुरुवात झाली असून, १२ दिवसात जवळजवळ ७० ते ८० टक्के गाळ काढण्याचे काम पूर्णत्वास आले असून, अजून राहिलेला संपूर्ण गाळ काढण्यास चार-पाच दिवस लागतील, अशी माहिती सरपंच भास्कर मोकल, माजी उपसरपंच सचिन घबाडी यांनी दिली.




चिखल माती व प्लास्टिक कचऱ्याचा गाळ तसेच नाल्यात वाढलेली झुडपे जेसीबीच्या साह्याने उत्तम प्रकारे साफ करण्याचे काम केल्यामुळे येथील नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

चिरनेर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून, सरपंच भास्कर मोकल, माजी उपसरपंच सचिन घबाडी, उपसरपंच दीपक कातकरी आणि ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या देखरेखेखाली, चिरनेर गावातील मुख्य आणि अंतर्गत नाल्यांमध्ये अडकलेला गाळ काढून, नाल्यांची सफाई करण्याची कामे जोरदारपणे सुरू आहेत. लवकरच ही नाले सफाईची कामे पूर्ण करण्यात येतील, अशी माहिती संबंधित प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

दरम्यान स्मशानभूमीजवळचा नाला, येल्याची खाडी, पारस बंगला, माई सेवा केंद्र, पूजा हॉटेल व मालती राईस मिल या ठिकाणच्या मुख्य व अंतर्गत नाल्यात साठलेला चिखल मातीचा व प्लास्टिक कचऱ्याचा गाळ काढण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. परिणामी पूर परिस्थितीचा संभाव्य धोका टळावा, यासाठी या नाल्यांची सफाई करण्यात येत असल्याची माहिती सरपंच भास्कर मोकल व माजी उपसरपंच सचिन घबाडी यांनी दिली.

## गुणगौरव सोहळा

**माणगाव :** माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, उतेखोल या संस्थेतर्फे नेहमी गुणवंतांचा सन्मान करण्यात येतो. यावर्षी संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील दहावी-बारावी व पदवी, पदवीत्तर, शिष्यवृत्ती प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. तरी संस्थेच्या सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स निजामपूर रोड, माणगाव या ठिकाणी दि.२० जूनपर्यंत सादर करावी, असे आवाहन संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी केले आहे.

**पर्यटन मंत्री शंभूराज देसाईंचे प्रतिपादन** | **शिवसृष्टी उभारण्याबाबत मंत्रालयात बैठक**

# स्वराज्याचा इतिहास होणार जिवंत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवसृष्टी प्रकल्पातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, विचार आणि स्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचणार आहे. या प्रकल्पामुळे घोडबंदर किल्ल्याच्या परिसराचा विकास होऊन पर्यटनाला चालना मिळेल, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

मंत्रालयातील दालनात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या समवेत ठाण्यातील मिरा-भाईंदर येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टी प्रकल्पाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव विजय पोवार, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीत शिवसृष्टी प्रकल्पाच्या विविध घटकांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रकल्पासाठी लागणारा शंभर टक्के निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या सर्व वैधानिक परवानग्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत प्राप्त करून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास उपलब्ध करून देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रकल्पाची कामे नियोजित कालावधीत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देसाई यांनी दिल्या.

याशिवाय, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तो मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात येणार असून, त्याच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिकेकडे सोपविण्यात येणार आहे.

घोडबंदर किल्ल्याच्या परिसराचा पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकास करून पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा निर्माण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी विचार, इतिहास आणि स्वराज्याची परंपरा जतन करून ती नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी शिवसृष्टी प्रकल्प महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## निवडक



### अन्नदान करून वाढदिवस साजरा

**रसायनी :** खाने आंबिवली मोहोपाडा येथील महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव प्रशांत बाळाराम खाने यांनी आपला वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत खालापूर तालुक्यातील श्री स्वामी समर्थ मठ, पलसदरी येथे साजरा केला. यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेऊन पूजा-अर्चा करण्यात आली. वाढदिवसानिमित्त मठात अन्नदानाचा उपक्रम आयोजित करण्यात आला. अनेक भाविक व गरजू बांधवांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी व स्वामी भक्तांनी प्रशांत खाने यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. ''वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची संधी आहे,'' अशी भावना प्रशांत बाळाराम खाने यांनी व्यक्त केली. धार्मिक व सामाजिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थित भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते.



### मेंढपाळांचा परतीचा प्रवास सुरू

**माणगाव :** कोकणात पावसाळ्याचे आगमन जवळ आल्याने गेल्या सहा महिन्यांपासून कोकणात वास्तव्यास असलेले घाटमाथ्यावरील मेंढपाळ आता आपल्या शेळ्या-मेंढ्यांसह परतीच्या प्रवासाला लागले आहेत. दरवर्षी पावसाळा संपल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात हे मेंढपाळ आपल्या कळपांसह कोकणात दाखल होतात आणि उन्हाळ्याच्या अखेरीपर्यंत येथे वास्तव्यास राहतात. कोकणातील जंगल परिसरात तसेच मोकळ्या जागांमध्ये शेळ्या-मेंढ्या चारून त्यांचा उदरनिर्वाह चालतो. याचबरोबर कोकणातील अनेक शेतकरी आपल्या शेतांमध्ये या कळपांना रात्री बसवितात. मेंढ्या व बकऱ्यांच्या विष्ठेमुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. त्याबदल्यात शेतकरी मेंढपाळांना ठराविक मानधन देतात. सुमारे सहा महिन्यांच्या मुक्कामानंतर आता पावसाळ्याची चाहूल लागल्याने मेंढपाळांनी घाटमाथ्याकडे परतीचा प्रवास सुरू केला आहे. शेकडो शेळ्या-मेंढ्यांचे कळप घेऊन हे मेंढपाळ दररोज अनेक किलोमीटरचा पायी प्रवास करीत आहेत. उन्हाचा कडाका वाढत असल्याने सकाळच्या थंड वातावरणात अधिक प्रवास केला जात असून दुपारच्या वेळेत झाडांच्या सावलीत विश्रांती घेतली जात आहे. कोकण आणि घाटमाथा यांना जोडणारी ही पारंपरिक भटकंतीची पद्धत आजही कायम असून ग्रामीण अर्थव्यवस्था, पशुपालन आणि नैसर्गिक शेती यांच्यातील परस्परसंबंध अधोरेखित करणारी ठरत आहे. पावसाळ्यापूर्वी आपल्या मूळ गावी पोहोचण्यासाठी मेंढपाळांचा हा प्रवास पुढील काही दिवस सुरू राहणार आहे.



### वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

**पनवेल :** पनवेल शहर वाहतूक शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत माननीय पोलीस उप आयुक्त (वाहतूक) नवी मुंबई, डॉ. राहुल खाडे यांनी पनवेल येथे भेट देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. वाहतूक व्यवस्थापन, अपघातग्रस्तांना तातडीची मदत तसेच गुन्हे प्रतिबंधक कारवायांमधील उत्कृष्ट योगदानाबद्दल संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पनवेल शहर वाहतूक शाखेतील अधिकारी व अंमलदारांनी रस्ते अपघाताच्या घटनांमध्ये तत्परता दाखवत जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करून त्यांचे प्राण वाचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. तसेच मोटरसायकल ट्रॅपच्या माध्यमातून वाहनचोरीचा प्रयत्न उधळून लावत आरोपीस ताब्यात घेण्यात यश मिळविले. याशिवाय शाळा परिसरात बाईकद्वारे हायड्रो गांजाची वाहतूक करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाची भूमिका बजावली. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भालचंद्र पाटील, पोलीस उपनिरीक्षक कदम, पोलीस हवालदार अमीर मुलाणी, केशव निकम, सतीश वाघमारे, महेंद्र राजपूत, सागर यादव, राकेश घाडगे तसेच पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ आणि सचिन शिंदे यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. राहुल खाडे यांनी वाहतूक अपघातांमध्ये होणारे मृत्यू कमी करण्यासाठी प्रभावी वाहतूक नियमन, कठोर अंमलबजावणी आणि जनजागृतीवर भर देण्याच्या सूचना दिल्या. 'झिरो अपघाती मृत्यू' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### 'एक दिवस भक्तीचा' कार्यक्रम

**रसायनी :** श्रीमद् जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज, दक्षिण पीठ, नाणीजधाम यांच्या प्रेरणेने रामानंद संप्रदायाच्या वतीने आयोजित 'एक दिवस भक्तीचा' हा भव्य आध्यात्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास हजारहून अधिक भाविक-भक्तगण उपस्थित होते. वर्षभर उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या सेवेकऱ्यांचा तसेच मरणोत्तर देहदान व अवयवदान केलेल्या पुण्यात्म्यांच्या नातेवाईकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या समाजहिताच्या कार्याचे कौतुक करून त्यांना विशेष शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज.न.म. संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील ठाकूर, कोकणपीठ सहाय्यक गणेशजी मोरे तसेच अखिल भारतीय ब्लड इन नीडचे सेक्रेटरी अभिनंदन जाधव यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. याशिवाय इतर मान्यवर मार्गदर्शकांनीही अध्यात्म, सेवा व समाजकार्यातील विविध विषयांवर प्रेरणादायी विचार मांडले. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय, शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दक्षिण रायगड जिल्हा सेवा समितीने घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे हा कार्यक्रम कोकणपीठातील एक आदर्श व उल्लेखनीय उपक्रम ठरला.

# खरीप भातशेती क्षेत्र घटतेय

| रोहा | प्रतिनिधी |

जिल्ह्यात भात शेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या रोहा तालुक्यात शेती ओसाड पडत असून तालुक्यातील भात शेती क्षेत्र घटत असल्याचे दिवसेंदिवस दिसून येत आहे. एकेकाळी रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जायचे. जिल्ह्यातील भातशेतीसाठी रोहा तालुका हा प्रसिद्ध होता त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोहा तालुक्यात भातावर आधारित पोह्याचे कारखाने होते. रोहाचे पोहे संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध होते. आज हे कारखाने नाजूक स्थितीत आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे रोहा तालुक्यातील भात शेती घटत असल्याचे चित्र दिसत आहेत. या पोहा कारखानांना आता भात बाहेरून आणला जातो.



रोहा तालुक्यात पावसाळी व उन्हाळी भात शेती लावली जात असत. पारंपारिक सोना, जया, रत्ना यासह अन्य जातीचे बियाणे लावली जात असत. पावसावर अवलंबून असलेली पावसाळी भात शेतीचे पूर्वी २०१७ च्या आधी क्षेत्र ९८०० हेक्टर होते ते हळूहळू कमी होत आज ७१०० हेक्टर एवढे झाले आहे. तर उन्हाळी म्हणजे कालव्याच्या व कुंडलिका नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेले भात शेतीचे क्षेत्र २००० हेक्टर पेक्षा जास्त होते. आता २०० ते ३०० हेक्टर वर भात शेती लावली जाते. पूर्वी भातशेतीची उत्पादन क्षमता हेक्टरी कमी असले तरी लागवडीचे क्षेत्र मात्र जास्त होते आता लागवडीचे क्षेत्र कमी असले तरी उत्पादन हेक्टरी वाढले आहे. पूर्वी हेक्टरी हेक्टरी भाताचे २६ ते २७ टन उत्पादन काढले जात होते आता तेच हेक्टरी भाताचे ३२ टन उत्पादन काढले जाते. परंतु आता भात लागवडीचे क्षेत्र घटले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमीन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| १८/३ | एकूण क्षेत्र ३-०१-०० हे.आर.खाते क्र. ५८६ यामधील आण्णा काळू खडेकर याचे मालकीचे विक्री क्षेत्र ०-५०-०० हे आर | ०.२३ |

तरी सदर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ११/०६/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं. १४१, बी-हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता. पेण, जि. रायगड पिन नं. ४०२१०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल पठाण मोबीन खान गुलजार खान यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक सौ.भाग्यश्री भगवान धुळे, राहणार मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| मौजे पाली तर्फे कोतलखलाटी, ता. कर्जत, जि. रायगड | १६/११ | ०.२३.०० | २.१३ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १०.०६.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव,
ता. कर्जत जि. रायगड.
मो.नं. ९३०७८८५७११

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ. शुभांगी शरद कवळे, २) सौ. हर्षला हरिश्चंद्र म्हात्रे यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| मु. झिराड ता. अलिबाग | ३८ | ०.४३.०० पो.ख. ०.०३.०० एकुण क्षेत्र ०.४६.०० | ०.७० |

या मिळकतीपैकी १) सौ. शुभांगी शरद कवळे, २) सौ. हर्षला हरिश्चंद्र म्हात्रे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-२३-५० हे. आर, आकार ०.३८ रू. पै ही मिळकत या जाहिर नोटिशीचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक- ०९/०६/२०२६

सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
**जिल्हा न्यायालय-रायगड, ता. अलिबाग,**
**जि. रायगड मोबाईल नं ९७६४२१४०१०**

प्रोसेस फी जमा रु.

अर्जदार तर्फे वकील
ॲड. महेंद्र यशवंत धामणे

**माणगाव येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व स्तर) यांचे न्यायालयात**
दिवाणी चौ. अर्ज क्र. ७७/२०२५

श्रीम. आरती निरंजन निराला वैगरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार क्र. १ यांचे पती आणि क्र. २ व ३ यांचे त्यांचे वडील कै. निरंजन कुमार निराला यांचा मृत्यू मौजे सुकेळी ता. रोहा येथे दि. ०२/११/२०२४ रोजी झाला असून यांचे नावे एस. बी. आय शाखा नागोठणे येथे पी.पी.एफ खात्यात रक्कम रु.११,३२,१४८ असून कै. निरंजन कुमार निराला यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत, या शिवास अन्य कोणीही वारस नाहीत, अर्जदार हे हिंदू धर्मीय आहेत, सदर मालमत्ता नाव मोबदला करणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टाकडे वारसपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे, सबब सदरचे वारसपत्र वरील अर्जदार यांना देणेसंबंधी कोणा इसमाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाले तारखेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात, मुदतीत हरकती न आल्यास कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल. मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

माणगाव
दि. ०२/०६/२०२६

**सही/-**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**वरिष्ठ स्तर, माणगाव**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सुभद्रा शंकर थळे, २) वत्सला सदानंद माने, ३) जयवंत गणपत शेलार, ४) साशिकला गणपत शेलार आणि ५) सरस्वती गणपत शेलार यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - नांदईपाडा, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २२७, एकूण क्षेत्र ००-०९-९० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. २.२०/-

ठिकाण: अलिबाग
दिनांक : ११/०६/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
विक्रांत झुंजारराव

**अर्जदाराचे वकील श्री आर बी कोसमकर**
**जाहिर नोटीस**

अलिबाग येथील मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १३५/२०२५
नेमलेली पुढील तारीख १७-०६-२०२६

श्री. आकाश छगनलाल ओसवाल
वय ५१ वर्षे, धंदा- शेती,
राहणार हाऊस नं. ९०५, रामनाथ रोड, ...अर्जदार
तांबोळी हॉस्पिटल जवळ, चेंढरे, अलिबाग,
ता. अलिबाग, जिल्हा रायगड,

या जाहिर नोटीसने सर्व तमाम लोकांस कळिवण्यात येते की,

सदरहू अर्जदार याने मयत कै. हरकचंद दानमल बाफना, राहणार तांबोळी, हॉस्पिटल जवळ, चेंढरे तालुका अलिबाग, जिल्हा रायगड यांनी त्यांचे हयातीत दिनांक १५/१०/२०२० रोजी केलेल्या मृत्युपत्राप्रमाणे लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन मिळणेकरीता मा. न्यायालयांत सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

कै. हरकचंद दानमल बाफना, यांचा दिनांक ७/३/२०२१ रोजी घर नं. ९०६, रामनाथ रोड, तांबोळी हॉस्पिटल जवळ, चेंढरे, अलिबाग ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथे मृत्यू झालेला आहे.

सदरहू दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या मृत्यूपत्राप्रमाणे त्यात खाली वर्णन केलेल्या मिळकती अर्जदारांना दिलेल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

१) मौजे अलिबाग, अलिबाग नगर परिषद सिटी सर्व्हे नं. ८७० अ, क्षेत्र ३७२.९० चौमी.
२) मौजे अलिबाग, अलिबाग नगर परिषद सिटी सर्व्हे नं. ८७० ब क्षेत्र ४८.५० चौ.मी.
३) मौजे अलिबाग, अलिबाग नगर परिषद सिटी सर्व्हे नं. ८७० सी क्षेत्र ४८.५० चौ.मी.
४) मौजे अलिबाग, अलिबाग नगर परिषद सिटी सर्व्हे नं. ८७० डी क्षेत्र ४८.५० चौ.मी.

वरील मिळकतीमधील बाफना हार्डवेअर या ईमारतीमधील

अ) मालमत्ता क्र. ZIMKT004127995 तळ मजल्यावरील गाळा नं. १ व २, क्षेत्र १५३.८४ चौ. मी. बिल्टअप

ब)मालमत्ता क्र. ZIMKT004 पहिल्या मजल्यावरील 127995सदनिका क्र. १०१, क्षेत्र ११२.८९ चौ. मी. बिल्टअप

क) मालमत्ता क्र. ZIMKT004127995 दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. २०१, क्षेत्र ९१.९९ चौ.मी.बिल्टअप

II) मौजे चेंढरे ता. अलिबाग येथील सर्व्हे नं. ७१/७२ या मिळकती मधील अलिबाग कमर्शिअल कॉम्प्लेक्स सहकारी संस्था मर्या. या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील ऑफीस गाळा नं. १२ (नवीन ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ७२६/२६) क्षेत्र ५०१ चौ. फुट बांधकाम ही मिळकत

III) मौजे अलिबाग मालमत्ता क्र. ZIMKT0012901000 सदनिका क्र.८ क्षेत्र २७.८१ चौ. मी. बिल्टअप यामधील माझा अविभाज्य हिस्सा

IV) मौजे चेंढरे मालमत्ता क्र. ९०५ क्षेत्र १९७५.०० चौ.फुट बिल्टअप

V) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा अलिबाग खाते क्र. 11236939892 या सेव्हींग अकाऊंट मध्ये असलेली शिल्लक रक्कम व स्टेट बँक ऑफ मध्ये असलेली एफडी ची संपूर्ण रक्कम एफडी क्र.३५८३७५९८६५६ दि.३०/३/२०२६

VI) यशोधन नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग यांचेकडील शेअर्स भाग क्र. ५१७ ते ५९८ भागधारक क्र. २५९

VII) राजस्थान मधील गाव पालडी (जोड) येथील राहते घर व त्या गावात असलेले जमिन

VIII) अ) मौजे दाखणे, ता. माणगाव, जि. रायगड येथील भुमापन व उपविभाग क्र. ११६/२, क्षेत्र ०-१५-०० हे. आर. आकार ०-०८ रु.पैसे.जागा

ब) मौजे दाखणे, ता. माणगाव, जि. रायगड येथील भुमापन व उपविभाग क्र. ११८/१४, क्षेत्र ०-१८-०० हे.आर.आकार ०-०५ रु.पैसे. जागा

क) मौजे दाखणे, ता. माणगाव, जि. रायगड येथील भुमापन व उपविभाग क्र. १२५/२८, क्षेत्र ०-१४-०० हे. आर. आकार ०-१७ रु.पैसे.जागा

IX) जुने भाजी मार्केट चन्दु पेठेवालेच्या शेजारील गाळा नितीन म्हात्रे

अर्जदार यांच्या अर्जास वा दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या मृत्युपत्रास कुणालाही व्यक्तिगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ती हरकत या पुढील नेमलेल्या तारखेस स्वतः अगर त्यांचे प्रतिनिधी वा वकील यांचेमार्फत सकाळी ११-०० वाजता मा. न्यायालयात हजर राहून लेखी स्वरूपात आवश्यक त्या कागदपत्रांसह नोंदवावी.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, नेमलेल्या तारखेस हरकत घेतली नाही तर हे मा. न्यायालय अर्जदार यांचे हक्कांबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व अर्जदार पात्र ठरल्यास अर्जदार यांना लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस आज दिनांक २६ माहे ०४ सन २०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपीक** — **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग,** — **जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) अशोक दत्तात्रेय भोईर आणि २) अविनाश पोसू पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - नांदईपाडा, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २६५, एकूण क्षेत्र ००-३४-६० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ६.०५/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ११/०६/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
विक्रांत झुंजारराव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे नसरापुर, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक सदानंद कोंडु कुंभार वगैरे यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | १ | ०-२६-०० | ०-२५ |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकांबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०६/२०२६

**ॲड. सी. बी. ओसवाल**
बी.कॉम. एल.एल.बी. दिनकर-निमकर
अपार्टमेन्ट बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड- ४१०२०१.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक तौफिक अब्दुल सत्तार नागोठणेकर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| चोंढी ता. अलिबाग जि. रायगड | ३७/२/अ | क्षेत्र ०.४५.८० पो.ख. ०.०१.३० एकूण क्षेत्र ०.४७.१० | १.७४ |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.०४.३० हे.आर, आकार ०.१६ रू. पैसे

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १०/०६/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
## जाहीर नोटीस

दि.०९/०६/२०२६
**जा.क्र.५७६/२०२६**

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | १ | ११२१/३ | भास्कर सह. गृह. संस्था | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळमजला २२५ चौ. फुट | जमिर जहूर टाके | हर्षला स्वागत मोकल, स्वागत विजय मोकल |
| २ | ४ | | सिगल सोसा. | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला चौ. फुट | साईनाथ रामचंद्र हातोडे | शितल साईनाथ हातोडे व इतर |
| ३ | ४ | ३३१/७ | विजया सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला ५७१ चौ. फुट | शिवानी राहूल सावंत | रंजिता अविनाश पाटील |
| ४ | ४ | १८२४/७ | सि शेल रेसिडेन्सी | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ४७९ चौ.फुट | महेश पुरुषोत्तम टिल्लू, मानसी महेश टिल्लू | अनुराग जीवनदास शेंडे |
| ५ | ४ | १७०३/६ | कृतिका सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ४४० चौ. फुट | भारती अनंत पोतदार | तेजस विजयकुमार तांबे |
| ६ | २ | | ॲकॉन्स प्रिव सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला चौ.फुट | अजित जयराम जाधव | जमालसाहेब उमरसाहेब धनसे तर्फे अखत्यारी इफतिखार उमर धनसे |
| ७ | ६ | ७३१/२ | गंगोत्री सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ लामजला ५४५ चौ. फुट | वासुदेव गोरेलाल खैरे | मंगेश रमेश माळी, प्राजक्ता रमेश माळी |
| ८ | ५ | १२९१/६ | अनुप्रभा सोसा सुजलाम नगर | आर. सी. सी. पक्के सिमेंट बांधकाम १ लामजला ५८५ चौ. फुट | विशाल शंकर म्हात्रे | सतेज शंकर म्हात्रे |
| ९ | २ | | विद्यानगर पश्चिम | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम घर २४६२ चौ. फुट | कुमुदिनी शाम सुभेदार | ओमकार उल्हास दळवी, ऋतुजा ओमकार दळवी |
| १० | २ | २४१/१/२ | विठ्ठलमंदिर रस्ता | पक्के सिमेंट बांधकाम घर | भावना भास्कर भगत | स्वरेश भास्कर भगत, रुपेश भास्कर भगत |
| ११ | ४ | १४७४/२ | गौरीनंदन सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम १ ला मजला | अरुण पांडुरंग पाटील | विलास पांडुरंग पाटील |
| १२ | ३ | २८९/११ | कोहीनूर सोसायटी | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम तळ मजला ४४३ चौ. फुट | विद्या संजय नाईक | नाथु प्रसाद रामचंद्र जयस्वाल, जयकिसन नाथु जयस्वाल |
| १३ | ६ | ९८३ | आनंदनगर रस्ता | पक्के सिमेंट बांधकाम सिमेंट पत्रा छप्पर घर चौ. फुट | जनार्दन महादेव कोळगावकर वे १२ | किरणदेवी गोपीकिशन दमाणी |
| १४ | २ | ११२९/१७ | साई सुधा अपार्ट, अलिबाग रेवस रस्ता | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ४५५ चौ. फुट | अनघा किशोर वैद्य | किशोर राजाराम वैद्य, स्वागता तुषार वालावकर, दिपंकार वैद्य |
| १५ | २ | २०५५/६ | अलिबाग पॅराडाइज | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला चौ. फुट | ए कॉर्प तर्फे हार्दिक पिनाकिन अजमेरा | मनोज प्रभाकर पुळेकर, प्रितम विजय भुसाणे |
| १६ | ५ | १६६०/८ | कृष्णदर्शन सोसा, डि विंग | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६५५ चौ. फुट | अमोल यशवंत पाटील, स्मिता अमोल पाटील | प्रदिप नामदेव पाटील |
| १७ | २ | १७८०/५ | बालाजी टॉवर | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ४७४ चौ. फुट | समिर मोहन सावंत | नितीन मुरलीधर जगे, नेहा नितीन जगे |
| १८ | ४ | १७७७/७ | ज्वेल्स ऑफ अलिबाग सोसा | आर.सी.सी.बांधकाम सदनिका पहिला मजला ७६० चौ.फुट | लंबोदर बेहरा | आदेश वैभव पाडावे वैभव गोविंद पाडावे |
| १९ | ४ | १४७७/१० | नवदुर्वांकूर सोसा | आर.सी.सी. पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला ६६२ चौ.फुट | तक्षशिला समिर चौबल | तक्षशिला समीर चौबल समीर शरद चौबल |
| २० | २ | १६०९/५ | स्मिता-अमृता सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ५५७ चौ.फुट | संतोष प्रभाकर राऊत, सारिका संतोष राऊत | नागेंद्र दिलीप म्हात्रे, शुभांगी नागेंद्र म्हात्रे |

**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग**

## निवडक



## उलवेच्या खेळाडूंची रौप्यमय कामगिरी

**पनवेल :** मुंबई महापौर चषक निमंत्रित ॲक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत पनवेल येथील देव स्पोर्ट्स अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत पाच रौप्यपदकांची कमाई केली. या शानदार यशाच्या जोरावर अकॅडमीने संघ अजिंक्यपद स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत आपल्या गुणवत्तेची पुन्हा एकदा छाप उमटवली. चेंबूर येथील श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन येथे झालेल्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत देव स्पोर्ट्स अकॅडमीच्या पनवेल आणि उलवे शाखेतील खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, समन्वय आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवले. महिला जोडी गटात मेहेक सलेशा व रिद्धी गेलडा यांनी रौप्यपदक पटकावले. पुरुष जोडी गटात शरव बेलसरे व मितेश धनावत यांनी प्रभावी सादरीकरण करत रौफ्य पदकावर नाव कोरले. मिश्र जोडी गटात मानव धनावत व दित्या इलासारिया, तसेच आरव पाटील व आर्याही पलावे या दोन्ही जोड्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत रौफ्यपदके मिळवली. महिला ट्रिओ गटात स्वरा ताटे, मधुश्री रत्नावत आणि आयशा पाटील यांनीही रौप्यपदक जिंकून अकॅडमीच्या यशात मोलाची भर घातली. खेळाडूंच्या सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरीमुळे देव स्पोर्ट्स अकॅडमीला संघ अजिंक्यपद स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचा मान मिळाला. या यशामुळे पनवेल व उलवे परिसरातील क्रीडाविश्वात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अविनाश मोरे आणि ज्योती मोरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## बेन स्टोक्सचा नाइटक्लबमध्ये राडा

**लंडन :** इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सचा नाइटक्लबमधील हाणामारीचा समोर आला आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने अद्याप या प्रकरणावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नसली, तरी स्टोक्सला कसोटी संघाचे कर्णधारपद सोडावे लागेल किंवा त्याला थेट निवृत्तीच घ्यावी लागेल, असे वृत्त इंग्लिश मीडियाने प्रसिद्ध केले आहे. दरम्यान,



न्यूझीलंडविरुद्ध लॉर्ड्स कसोटी जिंकल्यानंतर स्टोक्सने सहकाऱ्यांसह लंडनमध्ये जल्लोष केला. मात्र, हा उत्सव नंतर चेल्सीमधील एका प्रसिद्ध नाइटक्लबमध्ये झालेल्या गोंधळामुळे वादग्रस्त ठरला. स्टोक्स रविवारी रात्री लंडनमधील 'व्हाइट हॉर्स' पबमध्ये उपस्थित होता. तेथे त्याने अनेक डबल रम-अँड-कोक पेये मागवल्याचे सांगितले जाते. काही कर्मचाऱ्यांनी तो आधीच थोडा मद्यधुंद असल्याचे नमूद केले. त्यानंतर रात्री उशिरा तो आणि ॲटकिन्सन चेल्सीतील 'रेक्स रूम्स' या नाइटक्लबमध्ये गेले, जिथे इंग्लंडच्या रग्बी संघातील काही खेळाडूही उपस्थित होते. याच क्लबमध्ये विभागातील टेबलांवरून वाद निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. या वादात सामील झालेल्या एका रग्बीपटूने ॲटकिन्सनला मारण्याचा प्रयत्न केला; मात्र, तो ठोसा त्याच्या सुरक्षा कर्मचाऱ्याला बसला. जखमी सुरक्षा कर्मचाऱ्याला टाके घालावे लागल्याचे वृत्त आहे. या घटनेनंतर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, स्टोक्स आणि ॲटकिन्सन यांनी भांडण सुरू केले नव्हते, असा दावा विविध अहवालांमध्ये करण्यात आला आहे.

## इराण पाठीराख्यांसाठी तिकिट नाही

**तिजुआना :** विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेतील अमेरिकेत होत असलेल्या तीन साखळी सामन्यांचा इराण पाठीराख्यांसाठी असलेला तिकिटांचा वाटा फिफाने रद्द केल्याचा दावा इराण फुटबॉल फेडरेशनने



केला आहे. नियमानुसार स्टेडियमच्या क्षमतेनुसार प्रत्येकी आठ टक्के तिकिटांचा वाटा सामना होत असलेल्या संघांच्या फेडरेशनला देण्यात येत असतो. या विश्वकरंडक स्पर्धेत इराणचा सलामीचा सामना १५ जून रोजी न्यूझीलंडविरुद्ध लॉस एंजलिस येथील सोफी स्टेडियम येथे होणार आहे. इराणच्या पाठीराख्यांना तिकिटे देण्यात येणार नाहीत, असे आम्हाला कळले आहे, असे इराण फुटबॉल फेडरेशनने म्हटले आहे.

इराण संघटनेच्या दाव्यामुळे इराणी फुटबॉल, फिफा आणि स्पर्धेचा सह-यजमान असलेल्या अमेरिकेदरम्यानचा तणाव आणखी वाढला आहे. हा तणाव अमेरिकेने दि.२८ फेब्रुवारी रोजी इराणवर लष्करी कारवाया सुरू केल्यानंतर सुरू झालेला आहे. इराणचा संघ आता ॲरिझोनातील टक्सन येथे सराव करण्याच्या पूर्वनियोजित योजनेऐवजी मेक्सिकोच्या सीमेजवळील तिजुआना शहरात आहे. आमच्या संघातील काही पदाधिकाऱ्यांना अमेरिकेत प्रवेशासाठी व्हिसा नाकारण्यात आला आहे, असेही इराण फेडरेशनकडून सांगण्यात येत आहे. इराणचा संघ त्यांचे पुढील दोन साखळी सामने, दि.२१ जून रोजी इंगलवूड येथे बेल्जियमविरुद्ध आणि दि.२६ जून रोजी सिएटल येथे इजिप्तविरुद्ध खेळणार आहे.

## रोहित शर्मा अगामी सामन्यासाठी पूर्णपणे फिट

**नवी दिल्ली :** भारत आणि अफगाणिस्तान संघात नुकतेच मुल्लनपूरला कसोटी सामना पार पडला. यानंतर आता दोन्ही संघात दि.१३ जूनपासून एकदिवसीय मालिका सुरू होणार आहे. या मालिकेला धर्मशाला येथे सुरुवात होणार आहे. या मालिकेने भारतीय संघाच्या एक दिवसीय विश्वचषक २०२७ स्पर्धेसाठीच्या तयारीला सुरूवात होणार आहे. भारतीय खेळाडू देखील नुकतेच धर्मशाला येथे पोहचले आहेत. दरम्यान, या मालिकेपूर्वी रोहित शर्मा खेळणार की नाही, यावर प्रश्नचिन्ह होते. या मालिकेसाठी जेव्हा त्याची निवड झाली होती, तेव्हाच बीसीसीआयने त्याची उपलब्धता त्याच्या फिटनेसवर अवलंबून असल्याचे सांगितले होते. त्यामुळे त्याला बंगळुरूतील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये जाऊन त्याचा फिटनेस सिद्ध करावा लागणार आहे. रोहितला यंदाच्या आयपीएल स्पर्धेत खेळताना हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली होती, त्यामुळे त्याला ५ सामन्यांनाही मुकावे लागले होते. मात्र, तो काही दिवसांपूर्वीच सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये गेला होता. तिथे आता तज्ज्ञांनी रोहितला पूर्ण फिट असल्याचे घोषित केले असल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे रोहितच्या अफगाणिस्तानविरुद्धच्या खेळण्याला हिरवा कंदील मिळाला होता. त्यानंतर रोहित या मालिकेसाठी सज्ज असल्याचे लगेचच स्पष्ट झाले.

# तीन देशांमध्ये रंगणार 'फिफा'चा थरार

- ३२ वर्षांनंतर अमेरिकेत आयोजन
- रात्री, मध्यरात्री अन् पहाटेच्या वेळी थेट प्रक्षेपण

| लॉस एंजेलिस | वृत्तसंस्था |

फिफा विश्वचषक २०२६चा थरार अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांमध्ये रंगणार आहे. तब्बल ३२ वर्षांनंतर अमेरिका येथे जागतिक फुटबॉलची किक बसणार आहे. याआधी १९९४मध्ये अमेरिका येथे फुटबॉल विश्वकरंडकाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अमेरिकेतील ११, मेकिस्कोतील ३ आणि कॅनडातील २ अशा १६ प्रमुख शहरांमधील स्टेडियम्सवर एकूण १०४ सामने खेळवले जाणार आहेत. ही स्पर्धा दि.११ जून ते १९ जुलै (भारतीय प्रमाणवेळेनुसार दि.१२ जुन ते २० जुलै) या कालावधीत खेळवली जाणार आहे. उत्तर अमेरिका आणि भारताच्या प्रमाणवेळेतील मोठ्या फरकामुळे, या स्पर्धेतील बहुतांश सामने भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री, मध्यरात्री किंवा पहाटेच्या वेळी थेट प्रक्षेपित केले जाणार आहेत.



फिफा विश्वचषक २०२६ मधील आपल्या सलामीच्या सामन्यासाठी अमेरिका संघ मैदानात उतरत असताना, जागतिक पॉप स्टार शकीरा आणि नायजेरियन अफ्रोबीट सम्राट बर्ना बॉय हे उद्घाटन सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असणार आहेत. तसेच, या उद्घाटन सोहळ्यातील निश्चित कलाकारांमध्ये जे बाल्विन, टायला, बेलिंडा आणि डॅनी ओशन यांचा समावेश आहे. या विस्तृत संगीत समूहामध्ये अलेहांद्रो फर्नांडिस, लीला डाउन्स, माना आणि लॉस एंजेलिस अझुलेस यांसारख्या प्रमुख प्रादेशिक कलाकारांचाही समावेश आहे. त्याचप्रमाणे, संपूर्ण सांस्कृतिक प्रदर्शनात पारंपरिक लोकनर्तक आणि स्थानिक मेक्सिकन कलाकारांनाही मोठ्या प्रमाणावर स्थान दिले जाणार आहे. एका ऐतिहासिक निर्णयानुसार, प्रत्येक यजमान राष्ट्राचा गौरव करण्यासाठी स्पर्धेत तीन वेगवेगळे उद्घान सोहळे आयोजित करण्यात आले आहेत. कॅनडाच्या सोहळ्यात मायकल बुब्ले, एलानिस मॉरिसेट आणि नोरा फतेही सहभागी होणार आहेत, तर अमेरिकेच्या सोहळ्यात केटी पेरी, फ्युचर आणि लिसा हे कलाकार असणार आहेत. उद्घाटन समारंभापासून सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात मेक्सिको सिटी स्टेडियममधील चाहते सक्रिय सहभाग घेणार आहेत. हा उद्घाटनीय कार्यक्रम स्थानिक वेळेनुसार दि.११ जून रोजी दुपारी साडेचार वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार दि.१२ जून मध्यरात्री साडेबारा वाजता) सुरू होणार आहे.

या स्पर्धेतील उद्घाटनिय पहिला सामना मेक्सिको विरुद्ध दक्षिण अफ्रिका यांच्यात मेक्सिको सिटी स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे. तर, दुसरा सामना कोरिया प्रजासत्ताक विरुद्ध झेकिया यांच्यात एस्टाडियो ग्वादालहारा या स्टेडियममध्ये खेळविला जाणार आहे. या स्पर्धेत अमेरिकेतील ११ (७८ सामने), मेकिस्कोतील ३ (१३ सामने) आणि कॅनडातील २ (१३ सामने) अशा १६ प्रमुख शहरांमधील स्टेडियम्सवर एकूण १०४ सामने खेळवले जाणार आहेत. यंदाच्या विश्वचषकात ४८ संघ, १६ स्टेडियम, ३९ दिवस आणि १०४ सामने, अशी मोठी मेजवानी मिळणार आहे. गत स्पर्धेत ३२ संघ खेळले होते. यंदा ही संख्या ४८ पर्यंत वाढली आहे. या स्पर्धेत १२ गट असून, त्यात प्रत्येकी चार संघ आहेत. प्रत्येक संघ तीन साखळी सामने खेळणार असून, त्यानंतर ३२ संघ बाद फेरीसाठी पात्र ठरतील. हे ३२ संघ साखळी फेरीनंतर प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ आणि तिसऱ्या स्थानावरील सर्वोत्तम ८ संघ असे मिळून ठरणार आहेत.

त्यामुळे फुटबॉलप्रेमींना शुक्रवारपासुन फिफाचा थरार पाहायला मिळणार आहे.

### साखळी फेरीसाठी गटवारी

**ए गट :** मेक्सिको, दक्षिण आफ्रिका, कोरिया, झेकिया.
**बी गट :** कॅनडा, बोस्निया आणि हर्झेगोविना, कतार, स्वित्झर्लंड.
**सी गट :** ब्राझील, मोरोक्को, हैती, स्कॉटलंड.
**डी गट :** अमेरिका, पॅराग्वे, ऑस्ट्रेलिया, तुर्की.
**इ गट :** जर्मनी, कुराकाओ, आयव्हरी कोस्ट, इक्वेडोर.
**एफ गट :** नेदरलँड्स, जपान, स्वीडन, ट्युनिशिया
**जी गट :** बेल्जियम, इजिप्त, इराण, न्यूझीलंड.
**एच गट :** स्पेन, केप वर्दे, सौदी अरेबिया, उरुग्वे.
**आय गट :** फ्रान्स, सेनेगल, इराक, नॉर्वे.
**जे गट :** अर्जेंटिना, अल्जेरिया, ऑस्ट्रिया, जॉर्डन.
**के गट :** पोर्तुगाल, डीआर काँगो, उझबेकिस्तान, कोलंबिया.
**एल गट :** इंग्लंड, क्रोएशिया, घाणा, पनामा.

### दिग्गज खेळाडूंचा अखेरचा सामना?



लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो, हे जगातील सुपरस्टार फुटबॉलपटू फिफा विश्वचषक स्पर्धेत अखेरचे एकमेकांविरुद्ध खेळताना दिसू शकतात. दोघंही त्यांचा सहावा विश्वचषक खेळत आहेत आणि दोघांचे वय पाहता, हा त्यांचा शेवटचा विश्वचषक असण्याची शक्यता जास्त आहे. गतविजेत्या अर्जेंटिनासाठी विश्वचषक जिंकण्याचे स्वप्न मेस्सीने पूर्ण केले, तर रोनोल्डोच्या पोर्तुगालला एकदाची विश्वचषक जिंकता आलेला नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हे दोन्ही सुपरस्टार फिफा विश्वचषक स्पर्धेत आतापर्यंत एकदाही एकमेकांविरुद्ध खेळलेले नाहीत आणि यंदाच्या पर्वात हा सामना होण्याची शक्यता आहे. जर दोघांचेही संघांनी आपापल्या गटात अव्वल स्थान मिळवणे आणि ३२ संघांच्या फेरीतील व १६ संघांच्या फेरीतील दोन्ही सामने जिंकले तर अर्जेंटिना विरुद्ध पोर्तुगाल यांच्यातील एक जबरदस्त उपांत्यपूर्व सामना पाहायला मिळेल.

### सुर्यकुमारचा अम्पायरसोबत जोरदार वाद

| मुंबई | प्रतिनिधी |

टी-२० मुंबई लीगमध्ये सूर्यकुमार यादवच्या ट्राईम्फ नाइट मुंबई नॉर्थ ईस्ट संघाला पराभवाचा सामना करावा लागला. इगल ठाणे स्ट्रायकर्सने २४ धावांनी हा सामना जिंकून लीगमध्ये आगेकूच केली. परंतु, हा सामना भारताचा माजी कर्णधार सूर्यकुमारने अम्पायरसोबत घातलेल्या वादामुळे चर्चेत आला आहे. सोशल मीडियावर या प्रसंगाची जोरदार चर्चा सुरू आहे. ठाणे स्ट्रायकर्सच्या डावातील हा प्रसंग असून, व्हायरल झालेल्या फोटोत सूर्या अम्पायरसोबत जोरदार वाद घालताना दिसत आहे. ठाणे स्ट्रायकर्सने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १७२ धावा उभ्या केल्या. सुमैर झवेरी (४) आणि शॉन रॉड्रिगेज ६) हे दोन्ही सलामीवीर अपयशी ठरले. मानव भट (१८) यालाही फार मोठी खेळी करता आली नाही. मात्र, साईराज पाटील आणि सिद्धांत सिंग यांनी चौथ्या बळीसाठी ९४ धावांची भागीदारी करून संघाचा डाव सावरला. साईराजने ६९ धावा केल्या, तर सिद्धांतने २८ धावांचे योगदान दिले. हे दोघे बाद झाल्यानंतर ठाणे स्ट्रायकर्सला पुन्हा धक्के बसले, परंतु शाश्वत जगतापने २९ धावांची नाबाद खेळी करून संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. सिल्व्हेस्टर डिसोझा व मिनाद मांजरेकर यांनी प्रत्येकी दोन बळी घेतल. लक्ष्याचा पाठलाग करताना सूर्यकुमारचा ट्राईम्फ नाइट संघ १८.५ षटकांत १४८ धावांत तंबूत परतला. अखिल हेरवाडकर (३३) व परिक्षित वळसांगकर (३३) हे सर्वाधिक धावा करणारे फलंदाज ठरले. सूर्या २० धावा करून त्रिफळाचीत झाला. दरम्यान, सूर्यकुमार ठाणे स्ट्रायकर्सचा डाव सुरू असताना अम्पायरसोबत भांडताना दिसला.

## क्रिकेटमध्ये महिलांच्या सहभागात वाढ

| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |

भारतातील महिलांच्या खेळांबाबतच्या एका नवीन आणि व्यापक अभ्यासातील निष्कर्ष जाणून घेण्यासाठी, कलेक्टिव्ह न्यूजरूमच्या मराठी टीमने एका परिसंवादाचे आयोजन केले होते. त्यात क्रीडा, प्रसारमाध्यमे, धोरण आणि संशोधन क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींनी सहभाग घेतला होता.




या चर्चेत महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी क्रिकेटपटू डायना एडुलजी, लांब पल्ल्याच्या धावपटू ललिता बाबर आणि मुंबई क्रिकेट असो.चे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांचा समावेश होता. त्यांनी भारतातील महिलांच्या खेळांचे बदलत चाललेले स्वरूप, महिला खेळाडूंची वाढलेली दृश्यमानता आणि सहभागात अडथळा ठरणाऱ्या आव्हानांवर चर्चा केली. यावेळी अदिती तटकरे म्हणाल्या की, मुलींसाठी क्रीडा अकादमी उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याबाबत आम्ही एमसीए सोबत काम करत आहोत. ग्रामीण भागातील क्रीडा पायाभूत सुविधांसाठी आता निधी वाढला आहे; परंतु, अधिक सुविधांची निर्मिती होईल याचीही आम्हाला खात्री करावी लागेल, असेही त्या म्हणाल्या. त्यानंतर डायना एडुलजी म्हणाल्या की, जर प्रत्येक राज्य सरकारने ओडिशाप्रमाणे एखाद्या खेळाला दत्तक घेतले किंवा विशेष प्रोत्साहन दिले, तर भारतीय क्रीडा क्षेत्र अधिक उंची गाठेल, असे त्या म्हणाल्या. या संशोधनातून क्रिकेटमधील महिलांच्या सहभागात लक्षणीय वाढ, महिलांच्या खेळांकडे पाहणाऱ्या प्रेक्षकवर्गात वाढ आणि क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याबाबत तरुण महिलांच्या वाढत्या आकांक्षा दिसून आल्या आहेत. सर्वेक्षण केलेल्या भारतातील १४ राज्यांमध्ये २०२० पासून क्रिकेटमधील महिलांचा सहभाग दुप्पट झाला आहे. अनेक भागांत बॅडमिंटनमधील सहभागातही लक्षणीय वाढ झाली असल्याचे यावेळी स्पष्ट झाले आहे.

## पाकिस्तानच्या वरिष्ठ खेळाडूंना डच्चू

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय संघ श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली आशियाई स्पर्धेत जेतेपद कायम राखण्यासाठी उतरणार आहे. भारताने या स्पर्धेसाठी तगडा संघ जाहीर केलेला पाहून पाकिस्तान क्रिकेट बोर्ड घाबरल्याचे दिसत आहे. त्यांनी देखील १५ सदस्यीय संघ जाहीर केला असून, त्यात बाबर आझम, शाहिन शाह आफ्रिदी, सलमान अली आघा, शाबाद खान, हॅरिस रौफ आदी वरिष्ठ खेळाडूंना डावलले आहे. भारताविरुद्ध निभाव लागणार नाही, हे माहित असलेल्या पाकिस्तानने युवा संघ पाठवण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा रंगली आहे. पाकिस्तानने कर्णधार सलमान अली आगासोबत बाबरलाही आशियाई क्रीडा स्पर्धेच्या संघातून



वगळले आहे. २०२६ च्या टी-२० विश्वचषकानंतर आझमच्या टी-२० संघातील भविष्याबद्दल नेहमीच शंका होत्या. त्याने आपले स्थान गमावले होते आणि त्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आले होते.

## पहिल्या सामन्यात वैभवकडून निराशा

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत 'अ' संघाने तिरंगी मालिकेतील आपल्या पहिल्या सामन्यात श्रीलंका 'अ' संघावर ८ धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. ऋतुराज गायकवाडच्या शतकी खेळीच्या जोरावर भारताने मोठी धावसंख्या उभारली. त्याला कर्णधार तिलक वर्मानेही अर्धशतक झळकावत चांगली साथ दिली. मात्र, या सामन्यात सर्वांचे लक्ष वैभव सूर्यवंशीच्या कामगिरीकडे लागले होते. यंदाचे आयापीएल गाजवणारा वैभव प्रथमच भारताच्या वरिष्ठ खेळाडूंसोबत खेळायला मैदानावर उतरला होता. परंतु, तो स्वस्तात बाद होऊन



पॅव्हेलियनमध्ये परतला. पहिल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने चौकार मारून आपले खाते उघडले; परंतु, त्याला आपला डाव पुढे नेता आला नाही आणि तो १२ चेंडूंमध्ये १४ धावांवर बाद झाला. मात्र, या मालिकेत आणखी सामने शिल्लक आहेत आणि वैभव त्या सामन्यांत धुमाकूळ घालेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## वरिष्ठांनी ठोठावले बीसीसीआयचे दार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय संघ २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तयारीला लागला आहे आणि अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतून संघबांधणीला सुरूवात होणार आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर व निवड समिती प्रमुख अजित आगरकर यांना अजूनही काही बाबींवर टीकमार्क करायचे आहे. एक दिवसीय विश्वचषकाचा विषय येतो तेव्हा, विराट कोहली व रोहित शर्मा यांच्या भविष्याची चर्चा होणे साहजिक आहे. त्यात भारतीय संघातील काही वरिष्ठ खेळाडूंनी गौतम गंभीरला



डावलून थेट बीसीसीआयचे दार ठोठावले आहे.

रोहित आणि कोहली यांनी कसोटी व आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि २०२७ च्या विश्वचषक स्पर्धेसाठी त्यांच्या संघातील स्थानाबाबत शंका निर्माण झाल्या आहेत. गौतम गंभीरचा दृष्टिकोन आणि निवड समितीच्या मागण्यांनी या दोघांच्या स्थित्यंतरात भूमिका बजावली. आयपीएलमध्ये खेळताना कोहलीने हे स्पष्ट केले की, तो सध्या अशा स्थितीत नाही जिथे त्याच्याकडून पुन्हा स्वतःला सिद्ध करण्याची अपेक्षा केली जाऊ शकते. गौतम गंभीरच्या नेतृत्वाखालील संघ व्यवस्थापन आणि काही वरिष्ठ खेळाडू यांच्यात अद्याप एकमत झालेले नाही. सध्या, हे वरिष्ठ खेळाडू त्यांच्या भविष्याबद्दल बीसीसीआयच्या प्रमुख व्यक्तींच्या थेट संपर्कात आहेत, त्यामुळे गंभीर आणि निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर दोघेही अवघड परिस्थितीत सापडले आहेत. आता लक्ष एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तयारीवर केंद्रित झाले असल्याने, गंभीर आणि कर्णधार शुभमन गिल यांनी पुढाकार घेऊन ड्रेसिंग रूममध्ये आपले विचार ठामपणे मांडावेत अशी अपेक्षा आहे. ज्या वरिष्ठ खेळाडूंनी अनेक वर्षे भारताची सेवा केली आहे, त्यांच्याकडून संघाला कोणती भूमिका अपेक्षित आहे आणि पुढील १६ महिन्यांत संघबांधणीची योजना काय आहे, हे त्यांना समजावून सांगणे महत्त्वाचे आहे.

### २८४ धावांचा पाठलाग करताना किवींना अपयश | नाहिद राणा, जॉश इंग्लिस यांच्यात राडा

## बांगलादेशची ऑस्ट्रेलियावर आघाडी

| मिरपूर | वृत्तसंस्था |

बांगलादेशने पहिल्या एकदिवीय सामन्यात ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. मिरपूर येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात २८४ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाला अपयश आले. या सामन्यात बांगलादेशचा गोलंदाज नाहिद राणा चमकला; परंतु, त्याने ऑस्ट्रेलियन कर्णधार जॉश इंग्लिस सोबत घातलेला राडा चर्चेत राहिला. इंग्लिसला अडवण्यासाठी बांगलादेशी खेळाडूंना मध्यस्थी करावी लागली. बांगलादेशने हा सामना ८६ धावांनी जिंकला.



बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद २८४ धावांपर्यंं मजल मारली. त्यांचा सलामीवीर सैफ हसन (५) स्वस्तात माघारी परतल्यानंतर तंझिद हसन व नजमूल होसैन शांतो यांनी ९४ धावांची भागीदारी करून गाडी रुळावर आणली. नॅथन एलिसने ही भागीदारी तोडताना ४४ चेंडूंत ५४ धावा करणाऱ्या हसनला माघारी पाठवले. त्यानंतर लिटन दास (७) अपयशी ठरला. मात्र, शांतो (६७), मोसाड्डेक होसैने (नाबाद ८६) आणि तोवहिद हृदय (३१) यांनी संघाला आश्वासक धावसंख्या उभारून दिली. ऑस्ट्रेलियाकडून नॅथन एलिसने ३, तर लाएम स्कॉट व मॅथ रेनशॉ यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करायला उतरलेल्या ऑस्ट्रोलियाला २ धावांत दोन धक्के बसले. कर्णधार जॉश इंग्लिस १०व्या षटकात माघारी परतला, परंतु, त्याला बाद करणाऱ्या नाहिद राणा व त्याच्याच बाचाबाची झाली. इंग्लिसला आवरण्यासाठी शांतो पुढे आला आणि वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. कूपर कॉनली (३५) माघारी परतल्याने ऑस्ट्रेलिया अडचणीत आला होता. केरी देखील ४७ धावांवर माघारी परतला. पाठापोठ लिएस स्कॉट (२) व झेव्हियर बार्टलेट (१) हे देखील बाद झाल्याने बांगलादेशचा विजय जवळपास पक्का केला. दरम्यान, सामना सुरू असताना जोरदार वीज कडाडल्याने अम्पायर्सनी तातडीने बेल्स पाडल्या आणि खेळाडूंना ड्रेसिंग रूममध्ये जाण्यास सांगितले. त्यामुळे सामना ४२.२ षटकांत ९ बाद १९२ धावांवर थांबला होता. त्यानुसार या परिस्थितीत ऑस्ट्रेलियाच्या २६० धावा झाल्या असत्या तर त्यांना विजयी घोषित केले गेले असते. परिस्थिती न सुधारल्याने बांगलदेशला नुसार ८६ धावांनी विजयी जाहीर केले गेले. ग्रीन ५२ धावांवर नाबाद राहिला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)